# बिसेन डेन्टल केअर

**डॉ.दिप(पंकज) बिसेन** **डॉ.खुशबू बिसेन(पटले)**



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०




साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३० | बुधवार,दि.२ जुलै २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## विधानसभेत पटोले निलंबित

**मुंबई:**-राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत मोठा गदारोळ झाला. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भाजप आमदार बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून सभागृहात संताप व्यक्त केला. त्यानंतर नाना पटोले हे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या जा-गेजवळ गेले आणि त्यांनी राज दंडाला हात लावला. यानंतर नाना पटोले यांना एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले.

नाना पटोले म्हणाले की, या सरकारमधले सदस्य बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे ज्या पद्धतीने सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. हा अपमान आता राज्यातील शेतकरी सहन करणार नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या राज्याच्या शेतकऱ्यांची जाहीर माफी मागितली पाहिजे. ज्या पद्धतीने सातत्याने मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही. असे वक्तव्य अजिबात चालणार नाही. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे म्हणत नाना पटोले यांनी



जोरदार संताप व्यक्त केला. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले तुमच्याकडून असंसदीय भाषेचा उपयोग होणे, मला बरोबर वाटत नाही, हे चुकीचे आहे, असे त्यांनी म्हटले.

यानंतर नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्षांच्या जा-गेजवळ जात आपला संताप व्यक्त केला. यानंतर राहुल नार्वेकर यांनी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी रद्द केली. त्यानंतर नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले हे सभागृहाचे अध्यक्ष राहीले आहेत. राज दंडाला हात लावल्यानंतर काय कारवाई केली जाते, याची कल्पना तुम्हाला असेल. मला कारवाई करायला भाग पाडू नका, असे त्यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे योग्य नाही, नाना पटोले यांनी माफी मागितली पाहिजे, असे म्हटले.

## राज्यातील जि.प.पशुसंवर्धन विभागाचे काम आत्ता उपायुक्त पशुसंवर्धनकडे

**गोंदिया/खेमेंद्र कटरे** : राज्य सरकारने जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व राज्य सरकारचे उपायुक्त पशुसंवर्धन विभाग या विभागाचे एकत्रीकरण करून जिल्हा परिषदेकडील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे पद रद्द करत. त्याऐवजी या पदाचा भार आता उपायुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे.१ जुलै २०२५ पासून जिल्हा परिषदेतील पशुसंवर्धन विकास अधिकारी हे पद संपुष्टात आले आहे. त्याऐवजी या पदाचे काम आता उपायुक्त पशुसंवर्धन यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. तसेच या पदावर आता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त यांचे दुहेरी नियंत्रण राहणार आहे.

या बदलामुळे आता जिल्हा परिषदेचा पशुसंवर्धन विभाग, डेअरी विभाग तसेच सहायक निबंधक (पशुनोंदणी) हे तीनही विभाग एकाच छताखाली येणार आहेत.गेल्या सात ते आठ महिन्यांपासून राज्यातील पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा परिषदेतील पशुसंवर्धन विभाग आणि राज्य सरकारकडील दुग्ध व्यवसाय विभागाचे एकत्रीकरणाची वारे सुरू होते. या एकत्रिकरणानूसार आता प्रत्यक्षात कार्यवाहीला सुरूवात झाली आहे.

यामुळे जिल्हा परिषदेत १९६२ च्या पंचायत राज स्थापने-पासून असणारा पशुसंवर्धन विभाग आता उपायुक्त पशुसंवर्धन विभाग यांच्या नियंत्रणात आला आहे. असे असले तरी पशूसंवर्धन विभागासह ग्रामविकास विभागाचे जिल्हास्-तरावरील प्रमुख असणारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देखील या विभागावर थेट नियंत्रण राहणार आहे.याबाबतच्या आदेश राज्याचे पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी काढले आहेत.

या आदेशात १ जुलै २०२५ पासून जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे काम उपायुक्त पशुसंवर्धन हे पाहणार आहेत. तसेच जिल्हा परिषदेकडे असणारे जिल्हा पशू संवर्धन विकास अधिकारी या पदाचे समायोजन करण्यात आले आहे. दरम्यान, राज्य सरकारने यापूर्वीच तालुका पातळीवर तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी आणि तालुका पशूसंवर्धन अधिकारी वर्ग एक असे पद निर्माण केलेले आहे. लवकरच ही पदे कार्यान्वित करण्यात येणार असून या ठिकाणी सेवाज्येष्ठतेने जिल्हा परिषेदच्या पूशसंवर्धन विभागातील डॉक्टरांचे या ठिकाणी समायोजन करण्यात येणार आहे. या पदावरील जनावरांच्या डॉक्टरांच्या अधिकारात तालुक्यातील पूशधनासोबत दुग्ध व्यवसाय, त्यात होणारी भेसळ रोखणे, पशूच्या खाद्याची कारखाने याचे नियंत्रण येणार आहे. पशूसंवर्धन विभागात हा आता मोठा बदल होणार आहे.

यापूर्वी जिल्हा परिषदेच्या पूशसंवर्धन विभागात जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी या पदावर वर्ग एक कनिष्ठ स्तरातील अधिकाऱ्यांची नियुक्त होत होती. मात्र, आता या पूढे या पदावर वर्ग एक वरिष्ठ स्तर म्हणून अधिकाऱ्यांची बदली होणार आहे. मात्र, असे असे असले तरी आता या अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र संबंधीत तालुक्यापूरते मर्यादित राहणार आहे.

**या योजना येणाऱ्या उपायुक्तांच्या अखत्यारित**

तालुक्यातील पशुधनासोबत दुग्धव्यवसाय, त्यात होणारी भेसळ रोखणे, पशुखाद्य कारखान्यांवर नियंत्रण ठेवणे, तसेच राज्याच्या दुधाळ जनावरांच्या गटाचे वाटप करणे, कुक्कुट पक्षी वाटप, शेळी गट वाटप, याशिवाय केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान, राष्ट्रीय गोकुळ मिशन, राष्ट्रीय कृषी विकास योजना, स्मार्ट योजना, पशूगणना, चारा उत्पादन, आदी योजनांचे उपायुक्तांकडे समायोजन करण्यात येणार असल्याचेही डॉ.देवरे यांनी स्पष्ट केले आहे.

उपायुक्तांकडे आता ३२ पदांचा संवर्ग असणार आहे. यात दोन सहायक संचालक (तांत्रिक) तर एक गुणनियंत्रण अधिकारी जे पुर्वीचे दुग्ध विकास अधिकारी (पूर्वीचा डेअरी विभाग) यांचा समावेश आहे. तसेच तालुक्याला पशुसंवर्धन विकास अधिकारी विस्तार ऐवजी तालुका पशुसंवर्धन व दुग्ध विकास सहायक आयुक्त अशी दोन पदे हे पंचायत समिती आणि दवाखाना या ठिकाणी नियुक्त केली जाणार आहेत. औषध खरेदी तसेच बियाणे खरेदीबाबतचे अधिकारही उपायुक्तांना दिलेले आहेत.

**थोडा संभ्रम कायम**

यात जि.प. कर्मचारी अतिरिक्त ठरणार का, त्यांचे समायोजन कुठे केले जाणार, सेसच्या योजना कोण राबविणार, याविषयी आवश्यक मार्गदर्शन मिळणे बाकी आहे. त्यामुळे काहीसा संभ्रम असल्याचे वास्तव आहे.

**योजना: पूर्वी आणि आता**

पूर्वी जिल्ह्यात पशुवैद्यकीय १०५ दवाखाने होते. यापैकी जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागकडे ७५ तर राज्याच्या पशुसंवर्धन उपायुक्तांकडे ३० दवाखाने. तसेच केंद्र, राज्याच्या सर्व योजना ह्या जिल्हा परिषदेच्या यंत्रणेकडून राबविल्या जात असत. मात्र आता जि.प.चा संबंधित विभागच संपविल्याने सर्व योजना ह्या उपायुक्तांकडेच जाणार आहेत.

जि.प.शासनाच्या धो-रणानुसार पशुसंवर्धन विभाग आता पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्तांच्या नियंत्रणाखाली असणार आहे.आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे सर्व अधिकार द्यायचे होते,त्यासंदर्भातील कारवाई सुरु करण्यात आली आहे,**डॉ.विनोद कोटांगले प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प.गोंदिया**


## जिल्हा बँकेवर सहकार पॅनलचा झेंडा! परिवर्तन पॅनलला ८ जागा



**गोंदिया:-** गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २० संचालकपदासाठी रविवारी (दि.२९) निवडणूक पार पडली. यानंतर सोम वारी (दि.३०) मतमोजणी येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात पार पडली. या निवडणूकीत सहकार पॅनल आणि परिवर्तन पॅनल यांच्यात चुरशीची लढत झाली. यात सहकार पॅनलचे ११ तर परिवर्तन पॅनलचे ९ संचालक निवडून आले.त्यापैकी मच्छिमार संघाचे बाळा हलमारे यांनी सहकार पॅनलला समर्थन केल्याने परिवर्तन पॅनलची संख्या ८ राहिली आहे. त्यामुळे या निवडणुकीत सहकार पॅनलने मुसंडी मारत जिल्हा बँकेवर वर्चस्व स्थापन केले.

तब्बल १३ वर्षांनंतर जिल्हा बँकेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने युती करून सहकार पॅनल तयार करून, तर काँग्रेस आणि इतर पक्षांनी परिवर्तन पॅनल तयार करून ही निवद्णूक लढविली. जिल्हा बँकेच्या एकूण २० संचालक असून, यापैकी सहकार पॅनलचे माजी आ. राजेंद्र जैन आणि परिवर्तन पॅनलचे प्रफुल्ल अग्रवाल हे बिनविरोध निवडून आले. त्यामुळे १८ संचालकपदासाठी रविवारी प्रत्यक्षात निवडणूक पार पडली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत सहकार पॅनलने ११ आगा जिंकत बँकेवर वर्चस्व स्थापन केले, तर परिवर्तन पॅनलने ९ जागा जिंकत चुरशीची लढत दिली. सहकार पॅनलकडून रिंगणात असलेले आ. विजय रहांगडाले, राजकुमार बडोले यांनी विजय संपादन करीत सहकार क्षेत्रात एन्ट्री केली, तर परिवर्तन पॅनलचे माजी आ. दिलीप बन्स-ोड, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष

**पगारदार व पतसंस्था संघ**
**राजेंद्र जैन-अविरीध**
**वैयक्तीक मतदार संघ**
**प्रफुल्ल अग्रवाल-अविरोध**
**औद्योगिक वलुतेदार संघ**
**अरुण दुबे-५२**
**रेखलाल टेंभरे-२९**
**मार्केटिंग व जंगल कामगार**
**अशोक गुप्ता-३० विजयी**
**मृत्यूंजय सिंह-१४**
**दुग्ध सह संस्था संघ**
**पंकज यादव-१५ विजयी**
**राजकुमार कुथे-१२**
**मत्स्य सह.संस्था संघ**
**अजय हलमारे-३९ विजयी**
**सावलराम मारबते-३७**
**राखीव प्रतिनिधी (जिल्हा)**
**अनु.जाती/जमाती**
**राजकुमार बडोले-४३५ विजयी**
**दिलीप बन्सोड-४२३**
**महिला प्रतिनिधी**
**प्रिया हरिणखेडे-४५३ विजयी**
**रचना गहाणे-३८७ विजयी**
**उषाताई मेंढे-३८५**
**ज्योती पटले-३७७**
**वि.जा./भ.ज.**
**विनोद कन्मवार-५५५ विजयी**
**दामोदर नेवारे-२९७**
**रघुनाथ मेश्राम-८**
**इतर मागास वर्ग**
**अविनाश जायस्वाल-४५८ विजयी**
**राधेलाल पटले-४०३**
**सेवा.सह.मतदार संघ गोंदिया**
**केतन तुरकर-३९ विजयी**
**संजय चौधरी-२३**
**आमगाव**
**भेरसिंह नागपुर-२६ विजयी**
**सुभाष आकरे-२१**
**सालेकसा**
**येजेंद्र कटरे-१५ विजयी**
**प्रभाकर दोनोडे-९**
**देवरी**
**प्रमोद संगीडवार-९ विजयी**
**गोपाल तिराले-५**
**सडक अर्जुनी**
**गंगाधर परशुरामकर-१३ विजयी**
**गजानन परशुरामकर-१२**
**गोरेगाव**
**दुर्गाप्रसाद ठाकरे-२६ विजयी**
**योजराज पारधी-२३**
**तिरोडा**
**विजय रहांगडाले-५६ विजयी**
**वंदना अंबुले-१०**
**अर्जुनी मोरगाव**
**केवळराम पुस्तोडे-२७ विजयी**
**विजया कापगते-१३**



राधेलाल पटले यांना या निवडणुकीत पराभत झाला. या निवडणुकीत सहकार पॅनलचा एकतर्फी विजय होईल, अशी शक्यता होती, मात्र, निवडणुकीच्या निकालावरून दोन्ही पॅनलमध्ये चुरशीची लढत झाल्याचे पाहायला मिळाले.

प्रमुख पराभूत नेते माजी आ. दिलीप बन्सोड, बँकेचे माजी उपाध्यक्ष राधेलाल पटले, उषा मेंढे,रेखलाल टेंभरे, राजकुमार कुथे, राजू एन जैन, गजानन परशुरामकर या संचालकांचा या निवडणुकीत पराभव झाला.

जिल्हा बँकेची निवडणूक ज्यापद्धतीने फुके आणि पटेलांनी प्रतिष्ठेची करित नियोजन आखले त्याप्रमाणे काँग्रेसचे वरिष्ठ नेते करु शकले नाही. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी भाजप-राकाँच्या नेत्यांवर प्रसार माध्यमातून टिप्पनी शिवाय आपले अधिक संचालक कसे निवडून येतील याकरिता जे नियोजन आणि मदत करायला हवी होती ती केलेली नाही. आमदार नाना पटोले, अभिजीत वंजारी, सुधाकर आडवले असो की खासदार प्रशांत पडोळे यांनी पाहिजे तसी मदत न केल्याने काँग्रेसच्या उमेदवारांनी स्वकतृत्वावरच निवडणूक लढवून महायुतीला टक्कर देण्याचे काम केले.

### राजेंद्र जैन होणार अध्यक्ष ?

**महायुतीप्रणित सहकार पॅनेलने ११ जागा जिंकत बँकेवर आपले वर्चस्व कायम ठेवले असून, माजी आ. तथा बँकचे माजी अध्यक्ष राजेंद्र जैन है पुन्हा अध्यक्षपदी विराजमान होण्याची शक्यता असून, तसे संकेत खा. प्रफुल्ल पटेल आणि आ. परिणय फुके यांनी यापूर्वी दिले होते.**



### प्रफुल्ल पटेलांची खेळी उपयोगी

**जिल्हा बँकेची निवडणूक ही खा. प्रफुल्ल पटेल, आ. परिणय फुके व काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिष्ठेची केली होती. या निवडणुकीत सहकार पॅनलने ११ जागा जिंकत बँकवार वर्चस्व कायम राखले, तर परिवर्तन पॅनलने ही या निवडणुकीत आपली ताकद दाखवली. त्यामुळे जिल्ह्यातील सहकारी आणि राजकीय समीकरणे नव्याने आकार घेण्याची शक्यता आहे.**

## डव्वा-खजरी दरम्यान पुन्हा शिवशाही बसचा अपघात,मात्र जिवितहानी टळली

गोंदिया- गोंदिया कोहमारा राष्ट्रीय महामार्गावर १ जुर्ले रोजी सकाळी ११.४५ वाजेच्या सुमारास डव्वा-खजरी दरम्यान शिवशाही बसचा अपघात झाल्याची घटना घडली.गेल्या वर्षी २९ नोव्हेंबर रोजी याच मार्गावर याच परिसरात शिवशाही बसचा अपघात होऊन ११ प्रवाशांना आपला जीव गमावावा लागला होता.मात्र आजच्या अपघातात कुठलीही जिवीत हानी झाली नसल्याने अनुचित घटना टळली.घटनेची माहिती होताच महामंडळाचे अधिकारी व डुग्गीपार पोलिसांनी घटनास्थळ गाठून मदत कार्यास सुरवात केली.गोंदियावरुन नागपूरला जाण्याकरीता एमएच ०६,बीड्ब्लू ११७० ही शिवशाही बस निघाली.डव्वा ते खजरी दरम्यान विरुध्द दिशेने येत असलेल्या मोटारसायकलस्वारास वाचविण्याकरीता बसचालकाने एकदम स्टियरिंग फिरविल्याने बस अनियंत्रित होत विरुध्द दिशेला जात शेतात शिरली.

## नवे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी पदभार स्वीकारला

**मुंबई:**-शासनाने राज्याच्या मुख्य सचिवपदी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांची नियुक्ती केली आहे. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्यांनी ४९ वे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला.

राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या योजनांना अधिक गती देऊन सर्वसामान्यांना आपल्या कामांसाठी मंत्रालयापर्यंत येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी काम करणार असल्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले.



## भूमिगत गटार योजना शहरवासीयांसाठी डोकेदुखी

**चित्रा कापसे/तरोडा :-** गोंदिया नतर आता तिरोडा शहरा-तही नगर परिषद अंतर्गत भूमिगत गटार योजनेची कामे केली जात आहे. यासाठी रस्त्याच्या मधोमध मोठे खड्डे खोदून पाईप लाईन टाकण्यात येते. आज पहिल्याच पावसाने भूमिगत गटार योजनेच्या कामाची पोलखोक केली आहे. कंत्राटदाराच्या मनमर्जी कारभार व निकृष्ट कामामुळे जागोजागी खड्डे पडले व पावसाचे पाणी साचून राहिले तसेच या खड्यामध्ये वाहन अडकल्याने नागरिकांना वाहतूक कोडींचा सामनाही करावा लागले. उल्लेखीय असे की, या भूमिगत गटरा योजनेमुळे तिरोडा शहर चिखलमय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

तिरोडा शहरात गटर लाईन टाकण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती रस्त्यांवर खोलखोल खड्डे केले. त्यानंतर त्यामध्ये पाईप टाकून माती भरण्यात आली. मात्र, रस्ता सुरळीत करण्याचे काम अर्धवट सोडण्यात आले. काही ठिकाणी माती टाकली गेली असली तर, रोलर चालवला नाही. परिणामी संपूर्ण शहरा-तील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. पावसाळ्याच्या पहिल्या पावसात खड्ड्यांमध्ये पाणी सा-चून मोहनलाल चौक, आगाशे लेआउट, साई मंदिर, किल्लावाड ठाकूर मौला, जुनी वस्ती, सहकार नगर या ठिकाणी टेम्पो, टॅक्सी, कार, ट्रॅक्टर्स अडकल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असून अपघातांची शक्यता वाढली आहे.

दुचाकीस्वार घसरून पडत असून, काही ठिकाणी वाहने खड्ड्यांमध्ये अडकले आहेत. नागरिकांनी याला थेट ठेकेदार कंपनीची निष्काळजीपणा जबाबदार धरला आहे.



### अर्धवट कामामुळे नागरिकांचे हाल

**शहरात भूमिगत गटार योजनेच्या कामाला सुरुवात झाली आहे. या योजनेमुळे अनेक ठिकाणी अंडरग्राउंड केबल्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शहरातील विविध भागांत स्ट्रीट लाईट्स बंद पडून आहेत. तसेच पावसाळा सुरू होताच भूमिगत गटार योजनेची कामे अर्धवट करण्यात आल्याने नागरिकांची हाल होत आहेत. रस्त्यांवर साचलेले पाणी, चिखल व धूळीमुळे ये-जा करणे कठीण झाले आहे. नगर परिषद प्रशासनाने या बाबीकडे लक्ष द्यावे व संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे**



## विभागीय चौकशी सुरू असलेल्यांच्या खांद्यावर गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयाची मदार

### गडचिरोली जिल्ह्यातील विदारक वास्तव : दोन्ही अधिकारी पश्चिम महाराष्ट्रातील



**गडचिरोली(विशेष प्रतिनिधी):** -अतिदुर्गम, आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयात अतिशय महत्वाचे विभाग सांभाळणाय्रा उप जिल्हाधिकारी संवर्गातील दोन अधिकाय्रांपैकी एका अधिकाऱ्याने गोंदिया जिल्ह्यात देवरी उपविभागीय अधिकारी असताना पोलीस पाटील भरती नियुक्ती प्रकरणात लाखो रुपयाचा अपहाराबाबत तर दुसऱ्या अधिकाय्राने कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी उप विभागात क्रॅशर विरोधातील तक्रार अर्ज निकालात काढण्यासाठी सरपंचाकरवी एकुण अकरा लाखांची मागणी केली होती.त्यापैकी साडेपाच लाखांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडून अटक केल्याने शासनाची बदनामी केल्याबद्दल विभागीय चौकशी सुरू असून या दोन्ही अधिकाऱ्यांकडे गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयातील महत्त्वाची विभाग सोपविण्यात आल्याने सखेद आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयात अतिशय महत्व-ाचे टेबल सांभाळणाय्रा एका अधिकाऱ्याने गोंदिया जिल्ह्यातील देवरी उपविभागीय अधिकारी पदावर कार्यरत असताना पोलीस पाटील भरती प्रक्रिया राबविताना पोलिस पाटील भरती अर्ज हे विनामूल्य उपलब्ध करून देण्याची तरतूद होती. शासनाची परव-ानगी न घेता बँकेत खाते उघडले होते. पोलीस पाटील भरती प्रक्रिया राबविताना नियुक्ती आदेश निर्गमित करताना संबंधित उमेदवारांकडून मोठी रक्कम उकळून भरती प्रक्रिया संपल्यावर पोलीस पाटील भरती प्रक्रियेत अर्जदाराने भरलेली रक्कम बँकेच्या खात्यातून परस्पर काढून लाखोचा आर्थिक अपहार केला होता.या प्रकरणाची विभागीय चौकशी विभागीय कार्यालय नागपूर यांच्याकडे अद्यापही प्रलंबित आहे.

गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयातील दुसय्रा अधिकाय्राने कोल्हापुरात जिल्ह्यातील राधान-गरी तालुक्यातील फराळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत लिंगाचीवाडी येथे तक्रारदाराचे सिलीका वाळू वाशींग प्लाँट क्रशर होते. क्रशरच्या वाहतुकीमुळे रस्ते खराब होत आहेत, घरांना तडे गेलेत असे कारण पुढे करुन राधानगरी प्रात अधिकारी व फराळे गावचे सरपंच यांनी प्लॉटला भेट दिली. तो प्लाँट बंद करावा अशी नोटीस सरपंच यांनी बजावली होती. सरपंचांच्या नोटिसी संदर्भातून राधानगरी प्रांताधिकारी सरपंचाची भेट घेण्यास सांगितले.

त्यानुसार सरपंचांनी भेटीत, नोटीस रद्द करण्यासाठी प्रातांना १० लाख व आपल्याला दरमहा एक लाख रुपयेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. विभागाच्या पथकाने पडताळणी केली.त्यात तक्रारदार प्राताधिकारी यांना त्यांच्या निवासस्थानी भेटले, सरपंचांचा निरोप सांगितला, तशी प्रांतानी त्यास संमती दिली. त्यानंतर मुख्य प्रशासकिय इमारतीच्या आवारात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. सरपंचाच्या मोटारीत तक्रारदाराकडून लाचेचे ५ लाख रुपये प्राताधिकारीसाठी व स्वत:साठी ५० हजाराची रक्कम घेताना सरपंच यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर प्राताधिकारी यांना त्यांच्या राधानगरी प्रात कार्यालयात अटक केली. यांची विभागीय चौकशी पुणे येथे सुरू असून प्रलंबित आहे.

या दोन्ही अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशी कालावधीत शासनाच्या महसूल विभागाने गडचिरोली जिल्ह्यात शिक्षा म्हणून पाठवले. मात्र, या दोन्ही अधिकाऱ्यांकडे गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयात एका अधिकाऱ्याकडे उप जिल्हाधिकारी प्रशासन, भूसंपादन, जमीन तर दुसऱ्या अधिकाऱ्याकडे उप जिल्हाधिकारी निवासी, आस्थापना अशी महत्त्वाची विभाग सोपविण्यात आल्याने प्रशासकीय वतुर्ळात आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री तथा पालकमंत्री व सहपालकमंत्री अविरत प्रयत्नरत असले तरी जिल्हाधिकारी कार्यालयातील महत्त्वाच्या विभागावर या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी ठाण मांडले असून दोन्ही अधिकारी पश्चिम महाराष्ट्रातील असल्याने या अधिकाऱ्यांकडे मुद्दाम हून ही जबाबदारी देऊन जिल्ह्याच्या विकासाला ब्रेक लावण्यासाठी दोन अधिकाय्रांना जिल्ह्यात पाठवून शासनाच्या महसूल विभागातील झारीतील शुक्राचार्याची ही खेळी तर नाही ना असा प्रश्न विचारला जात आहे.

साप्ताहिक
बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक
http://berartimes.com
बुधवार,दि.०२ जुलै २०२५


संपादकीय

# महाराष्ट्रात हक्क मराठीचा!

मराठी भाषा अभिजात आहे म्हणून समाजरूपी "कपाटात ती शोभेच्या वस्तूसारखी बंद करून ठेवणार आहोत का आपण? ती रुजली नि आमच्या मातीच्या कणाकणांतून फुलली तरी ती वाढणे आणि बहरणे हे खूप महत्त्वाचे आहे. ती कशी वाढवायची याचा उत्तम आदर्श शिवाजी राजांनी घालून दिला. फार्सीचे मराठीवरील आक्रमण रोखण्यासाठी त्यांनी अनेक दिशांनी प्रयत्न केले. राज्य व्यवहार कोश करून घेतला. स्वतःची नाममुद्रा निर्माण केली. आपला राज्य कारभार मराठीतून व्हावा, यावर भर दिला आणि तसे आदेश दिले. "आज्ञापत्रे' हे याचे उत्तम उदाहरण.

भाषाप्रदूषण थांबवण्याकरिता स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी नवनवीन शब्द निर्माण केले. मराठी ही अतिशय लवचिक भाषा आहे. अनेक शब्द छटांनी समृद्ध असा तिचा विपुल शब्दसंग्रह आहे. प्रत्येक काळाला समांतर राहून विविध क्षेत्रांत आलेल्या नवनवीन शब्दांसाठी नवे शब्द निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणे ही मराठी भाषक समाज म्हणून आपली जबाबदारी आहे.

मराठी भाषक समाज म्हणून आपल्या काय-काय जबाबदाऱ्या आहेत, हे आपण आजवर किती आस्थेने जाणून घेतले, हा प्रश्न विचारायची वेळ निघून गेली आहे.

आज पहिलीपासून तिसरी भाषा मुलांवर लादणे आणि त्यासाठी हिंदीसमोर शासनाने पायघड्या घालणे या विषयाने सर्वत्र उग्र वादळाचे स्वरूप धारण केले आहे. कितीतरी वर्षांनी मराठी विषयीच्या अस्वस्थतेने समाज ढवळून निघाला आहे. पाचवीपासून विद्यार्थी शालेय जीवनात अगदी व्यवस्थित हिंदी शिकतच होते. हे सर्व अचानक बदलण्याचा घाट शासनाने घालू नये. यातून मराठी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये तेढ वाढण्याखेरीज दुसरे काहीही हाती लागणार नाही. आपल्याच भूमीतल्या भाषांना वैरी म्हणून एकमेकींसमोर उभे करून काय साध्य होणार?

खरं तर मराठी इतकी सक्षम आहे की, अन्य कोणतीही भाषा तिला संपवू शकत नाही. पण आपणच जेव्हा एखाद्या भाषेला शरण जातो तेव्हा ती परकी भाषा आपल्या भाषेचा अवकाश कसा गिळंकृत करते, हे आपण इंग्रजीमुळे अनुभवलेच आहे. भाषावार प्रांतरचनेने त्या-त्या राज्याच्या भाषेला तिचा हक्क मिळवून दिला आहे. त्या-त्या राज्यात तेथील भाषा अबाधित ठेवण्याची जबाबदारी त्या-त्या राज्य शासनाने घेतलीच पाहिजे. महाराष्ट्रात तो हक्क मराठीचा आहे.

तिच्या विकासासाठी भरीव अनुदान उपलब्ध करून देणे, शिष्यवृत्त्या देणे, प्रकल्प उभे करणे, त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे, विविध विद्यापीठांशी जोडून घेणे, शालेय आणि उच्च शिक्षणात तिचे स्थान अग्रक्रमावर ठेवणे, नोकऱ्यांमध्ये मराठी भाषेचा अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांकरिता तरतुदी करणे या दिशेने शासनाने गंभीरपणे पावले उचलण्याची वेळ आली आहे. आपण मराठीच्या बाजूने ठामपणे उभे आहोत, हे सिद्ध करणारे सकारात्मक काम मायबाप सरकारने हाती घ्यावे आणि त्याकरिता समंजस पाऊल म्हणून "हिंदी सक्तीच्या' विषयावरून उठलेले हे वादळ त्वरित शमवावे. अभिजात मराठीचा हा गौरव ठरेल!

# हिंदी भाषा सक्तीचे राजकारण

मराठी भाषा महाराष्ट्राची अस्मिता आहे. महाराष्ट्राच्या मातीचे वैभव आहे. मराठी येथील लोकांची मातृभाषा आहे. मराठी भाषेच्या रसा-कसावर महाराष्ट्राचे सांस्कृतिक भरणपोषण झाले आहे. सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्र अधिक उदात्त,उन्नत व प्रगत आहे. मराठी मातीत अनेक संत, पंथ, महंत व विचारवंत जन्मास आले आहेत.मराठी साहित्याने भारताच्या प्रबोधन चळवळीचे नेतृत्व केले आहे. मराठीने अनेक भाषा, विचार, कला, कलावंत आणि संस्कृतीला स्वतःत सामावून घेतले. त्यामुळेच मराठी भाषा अधिक समृद्ध, संपन्न व वैभवशाली झाली. मराठीचा गौरवशाली इतिहास लक्षात घेऊन केंद्र सरकारने अलीकडेच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला.मराठी भाषेच्या सन्मानार्थ दिल्ली दरबारी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले. संमेलनात सत्ताधाऱ्यांनी मराठीचा गुणगौरव करणारी भाषणे दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेच्या रत्नजडीत मुकुटाने अलंकृत करण्यात आले. तेव्हा सर्व मराठी जनांना अपार आनंद झाला. परंतु अल्पावधीतच हे पाताळयंत्री सत्ताधीश या सम्राज्ञीच्या हाती भिकेचा कटोरा देतील याची कुणालाही कल्पना नव्हती. महाराष्ट्र सरकारने शालेय स्तरावर इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य केली आहे. त्यामुळे मराठी भाषा आपल्याच घरात परकी होणार आहे. हळूहळू ती दुर्लक्षीत व दुय्यम ठरणार आहे.मराठी भाषेसोबत सवतीमत्सर वाढणार आहे. आणि मराठी भाषेची अवस्था दिवसेंदिवस दीनवाणी होणार आहे.

कोणतीही भाषा केवळ संवादाचे माध्यम नसते.तर, भाषा ही संस्कृती निर्माणाचे व उन्नयनाचे साधन असते.भाषा व्यक्तीला व्यक्तीशी जोडते. व्यक्तीला समूहाशी जोडते. समूहाला समूहाशी जोडते. भाषिक साम्यामुळे त्यांच्यात भावनिक,व्यावहारिक, वैचारिक व सांस्कृतिक नातं निर्माण करते. कोणतीही भाषा समाजाची फार मोठी शक्ती असते. ती समाजाला संघटित ठेवते. प्रतिभावंतांच्या व प्रज्ञावंतांच्या नवनिर्माणातून ती स्वतः अधिक उन्नत व प्रगत होत जाते. आणि समाजाला प्रगतीची नवी दिशा देते. महाराष्ट्रात संत नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, जनाबाई, मुक्ताबाई अशा अनेक संतकवी व कवयित्रींनी मराठी भाषेला, समाजाला आणि महाराष्ट्र संस्कृतीला समृद्ध,संपन्न तद्धतच प्रगल्भ केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी मावळ्यांना एकत्र करुनच महाराष्ट्र धर्म जागविणारे रयतेचे राज्य स्थापन केले. पुढे अव्वल इंग्रजी राजवटीच्या नवयुगात सत्यशोधक दृष्टीने महात्मा जोतिराव फुलेंनी छत्रपती शिवरायांची समाधी शोधून काढली. भारतात पहिली मुलींची मराठी शाळा सुरू केली. धर्माज्ञा झुगारून सावित्रीमाई फुलेंना आद्य शिक्षिका बनविले. महाराष्ट्रात परिवर्तनाच्या प्रयोगशाळेचा पाया घातला. गो.ग.आगरकर, लोकहितवादी, शिंदे, कर्वे इत्यादी सुधारकांनी परिवर्तनाला चालना दिली. महात्मा गांधींच्या नेतृत्वातील स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र महाराष्ट्रच होते. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातच विषमतेविरुद्ध रणशिंग फुंकून संपूर्ण भारतात क्रांतिपर्व साकार केले.या सर्व घडामोडीत महाराष्ट्र अग्रेसर आहे.त्यामुळेच महाराष्ट्र आधुनिक भारताच्या जडणघडणीत मार्गदर्शक ठरला आहे.

महाराष्ट्राची एकूणच संस्कृती सभ्यता,शालीनता व विवेकाच्या अधिष्ठानावर उभी आहे. मराठी भाषेने महाराष्ट्राच्या मातीत सहिष्णुता पेरली आहे.संत नामदेवांच्या नीतीने, तुकोबांच्या गाथेने, शिवरायांच्या शौर्याने, ज्योतीबांच्या सत्य शोधनाने, सावित्रीच्या शिक्षणज्योतीने आणि आंबेडकरांच्या क्रांतिकार्याने महाराष्ट्र जीवन तेजोमय झाले आहे. महाराष्ट्रातील संतांचे व विचारवंतांचे विचार-कार्य संपूर्ण भारतासाठी प्रेरक आणि उद्‌बोधक ठरले आहे. भारतातील इतर सर्व राज्यांपेक्षा महाराष्ट्राचा इतिहास असा देदीप्यमान आहे. मराठीने महाराष्ट्राच्या समाजमनावर शौर्याचे व धैर्याचे संस्कार केले. तसेच सभ्यतेचे, शालीनतेचे, बुद्धिवादाचे व पुरोगामी जीवनदृष्टीचे संस्कार केले आहेत. हाच मराठी भाषेचा विचारवारसा शिक्षणाच्या माध्यमातून बालमनांवर बिंबविण्यात आला. २०१४ पर्यंतच्या महाराष्ट्र शासनाने मराठी मातीची स्वाभिमानी व पुरोगामी वृत्ती कसोशीने जपली. महाराष्ट्राचा व मराठीचा माथा उन्नत होईल अशी शैक्षणिक ध्येयधोरणे राबविली. त्यामुळे महाराष्ट्रात स्वतंत्र व प्रगत विचारांच्या पिढ्या निर्माण झाल्या.त्यातूनच येथे अनेक पुरोगामी चळवळी उदयास आल्या.आणि प्रतिगामी विचारसरणी पिछाडीवर गेली...

परंतु २०१४ पासून प्रतिगामी विचारसरणी सत्तास्थानी आली.आणि संपूर्ण भारतात राजकीय,सामाजिक,आर्थिक, धार्मिक,सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड उलथापालथ सुरू झाली.लोकसत्ता दुबळी करून धर्मसत्ता प्रबळ करता यावी. हातात आलेली सत्ता कायम ताब्यात ठेवता यावी.आणि येणाऱ्या पिढ्यांना अधिक धर्मांध बनविता यावे.यासाठी संघ-भाजपा सरकारने शिक्षण क्षेत्राला प्रमुख लक्ष्य केले आहे. शिक्षणाच्या नावावर धार्मिक संस्कार करणे,विपर्यस्त इतिहास शिकविणे मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहे.शिक्षणव्यवस्थेच्या माध्यमातून भारतीय समाज अधिक अंधश्रद्ध व धर्मांध बनविण्याची योजना आखण्यात आली आहे. महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करणे हा या योजनेचाच एक भाग आहे.

भाषा ही केवळ भाषा नसते. ती संस्कृती असते.भाषेला लोकजीवनाचे भक्कम अधिष्ठान असते.भाषेतून वेदना,संवेदना, भावना, विचार,संस्कार व्यक्त होतात.भाषा मातीचे सत्व आणि मातेचे ममत्व घेऊन प्रकटते. भाषा संस्कृतीचे जतन आणि निर्वहन करते.भाषा लोकांच्या स्थानिक अस्मितांसह प्रादेशिक पृथगात्मता जपते.त्यामुळेच एका प्रदेशातील भाषा दुसऱ्या प्रदेशावर थोपवणे म्हणजे तेथील लोकसंस्कृतीवर, अस्मितेवर आणि प्रादेशिक पृथगात्मतेवर अतिक्रमण असते.भाषेचा एक स्वभाव असतो.भाषेतून वृत्ती, प्रवृत्ती व्यक्त होत असते. कारण भाषा ही लोकांच्या वृत्ती-प्रवृत्तीचीच उत्पत्ती असते. भाषेची एक ओळख असते. जसे- संस्कृत या भाषेत अनेक गुण असले तरी,संस्कृत भाषा लोकभाषा नाही.ही विशिष्ट लोकांची भाषा आहे.भेदभाव, विषमतेचे उगमस्थान अशी सुद्धा या भाषेची ओळख आहे. अध्यात्म हा या भाषेचा मूळ स्वभाव आहे. हिंदी ही उत्तर भारतातील बहुसंख्य लोकांची मुख्य भाषा आहे.संवाद व्यवहाराचे मुख्य माध्यम आहे. समान भाषेमुळे उत्तर भारतातील धार्मिक व सांस्कृतिक जीवन बहुअंशी मिळतेजुळते आहे.पंजाब, हरियाणा वगळता उत्तर भारतात धार्मिक साम्यता आहे. लोकजीवनामुळे हिंदी भाषेवर आणि हिंदी भाषेमुळे उत्तर भारतीय लोकजीवनावर हिंदुधर्माचा पगडा अधिक आहे. जातीय मानसिकता,टोकाची विषमता,सामाजिक भेदभाव, अन्याय,अत्याचार,शोषण, उत्पीडन,कर्मकांड,अंधश्रद्धा, स्त्रीदास्य, द्वेष,अरेरावी,मग्रुरी, गुन्हेगारी,आक्रमकता, हडपशाही,दडपशाही वृत्ती इत्यादी बाबी उत्तर भारतीय समाजजीवनाची स्वाभाविकता आहे. हिंदुधर्माच्या बाहुल्यामुळे आणि प्राबल्यामुळे उत्तर भारताची गायपट्टा (cow belt) अशी सुद्धा ओळख आहे. उत्तर ध्रुवाकडून आलेल्या आर्यांच्या गो-पालक टोळ्या याच भागात स्थिरावल्या. इथूनच मालकी हक्क गाजवू लागल्या. जोर-जबरदस्तीने व आक्रमक वृत्तीने आपली रानटी संस्कृती रुजवू लागल्या.पुढे ही रानटी, आक्रमक व हिंसक प्रवृत्ती येथील संस्कृतीत मिसळली. अनेक धर्मग्रंथांमधून या शोषक, आक्रमक, हिंसक व विध्वंसक विकृतीचे उदात्तीकरण करण्यात आले.त्यामुळे या अपप्रवृत्तीला धार्मिक पवित्रता प्राप्त झाली. इतर सर्व बाबींपेक्षा धर्म हेच जीवनाचे सर्वस्व आहे.ही उत्तर भारतीय समाजमनाची मुख्य धारणा बनली.त्यामुळे उत्तर भारत तुलनेने अधिक धर्मश्रद्ध, धर्मपरायण व धर्माभिमानी झाला.

उत्तर भारतीय समाजजीवनात धर्मभावना अधिक प्रबळ आहे. धर्म त्यांच्या निष्ठेचा व आस्थेचा भाग आहे. त्यामुळेच संघ-भाजपाने आपल्या धर्मांध राजकारणाची सुरुवात उत्तर भारताकडून केली. आणि संघ-भाजपाच्या धर्माधिष्ठित राजकारणा भोवती उत्तर भारत एकवटला. संघ-भाजपाच्या धर्मकेंद्री राजकारणाला खरे बळ उत्तर भारताने दिले. गाय गोबर पट्टयाने म्हणजेच हिंदी भाषिक पट्टयाने दिले. उत्तर भारतातील हिंदी भाषिक संस्कृती अधिक धर्मनिष्ठ आहे. त्यामुळे संघ-भाजपाला भारताची राजकीय सत्ता हस्तगत करणे शक्य झाले आहे. उत्तर भारत ते मध्य भारत (मध्यप्रदेश) हा टापू हिंदू धर्म आणि हिंदी भाषा या बळावर त्यांनी ताब्यात घेतला आहे. महाराष्ट्रात हिंदी विरोधी भूमिका घेवून मराठी अस्मितेचे राजकारण करणाऱ्या शिवसेनेच्या सोबतीने भाजपाने महाराष्ट्राच्या राजकारणात शिरकाव केला. शिवसेनेची मदत घेवून स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. शिवसेनेची गरज संपताच मराठी माणसाच्या हिताचे राजकारण करणाऱ्या शिवसेनेला उद्धवस्त केले. हिंदीचा जप करणे सुरू केले. महाराष्ट्र राज्य हे उत्तर भारतातून दक्षिण भारतात शिरण्याचे प्रवेशद्वार आहे ! हिंदीच्या माध्यमातून कट्टर हिंदुत्वाचे राजकारण करणाऱ्या भाजपाला मऱ्हाठी बाण्याच्या महाराष्ट्राने मध्येच रोखून धरले आहे. अजूनही दक्षिण भारतात भाजपाला घट्टपणे पाय रोवता आले नाही. दक्षिण भारताने आजही अपेक्षित प्रमाणात हिंदीला स्वीकारलेले नाही.हा केवळ प्रादेशिक मुद्दा नाही. येथे भाषिक भेदासह भाषाधिष्ठित सांस्कृतिक भेद सुद्धा महत्त्वाचा आहे, ही बाब येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.




संघ-भाजपा हे एकचालकानुवर्ती प्रवृत्तीचे पक्ष-संघटन आहे. या प्रवृत्तीला संपूर्ण भारतात एक धर्म, एक भाषा, एक संस्कृती,एकहाती सत्ता अशी व्यवस्था निर्माण करायची आहे. या देशातील ऐतिहासिक व गौरवशाली विविधता संपुष्टात आणायची आहे. अनिबंध शोषणसत्ता स्थापित करायची आहे. त्यांचे अनेक गुप्त मनसुबे आहेत. त्यासाठी ते वेगवेगळे हातखंडे वापरित आहेत. अनेक निर्णय थोपवित आहेत.पुढे रेटत आहेत. महाराष्ट्राच्या शालेय अभ्यासक्रमात इयत्ता पहिली पासून हिंदी भाषा अनिवार्य करण्यामागे हाच उद्देश दडला आहे.

महाराष्ट्रातील भाजपाच्या नेतृत्वाला राष्ट्रीय राजकारणात आपले स्थान भक्कम करायचे आहे. या हव्यासापोटी ते अनेक निर्णयात महाराष्ट्राचा बळी देण्यास तयार आहे. महाराष्ट्रातील अनेक मोठे उद्योग गुजरातच्या झोळीत टाकले आहेत. मुंबई ते अहमदाबाद मेट्रो ट्रेन महाराष्ट्राच्या पैशाने सुरू करून गुजरातला आंदण दिली आहे. पुढे हिंदी भाषेचे व हिंदी भाषिकांचे प्राबल्य वाढवून मुंबई गुजरातला जोडण्याचा गुप्त करार झाला असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या मराठी मुलखावर तशीही हिंदी भाषिकांची पकड मजबूत होवू लागली आहे. उद्योग,व्यवसाय व रोजगाराचे क्षेत्र हिंदी भाषिकांनी बऱ्यापैकी काबीज केले आहे. २०१४ नंतरचे महाराष्ट्राचे राजकारण हिंदी भाषिकांनी बऱ्यापैकी व्यापले आहे.

कोणत्याही भाषेचा अथवा भाषिकांचा विरोध करणे अपराध आहे. तसेच कोणत्याही राज्याच्या स्वतंत्र अस्मितेवर, त्याच्या पृथगात्म अस्तित्वावर व संस्कृतीवर अतिक्रमण करणे आणि त्या प्रदेशाचा सांस्कृतिक इतिहास पुसण्याचा प्रयत्न करणे हे देखील अनुचित आहे. सर्व भारतीयांना भारताच्या कोणत्याही कोपऱ्यात जाण्याचा, उद्योग, व्यवसाय करण्याचा सांविधानिक अधिकार आहे. परंतु तेथील भाषा,संस्कृती व जीवनशैली स्वीकारून त्या प्रदेशाशी एकरूप होणे हे परप्रांतीयांचे कर्तव्य आहे.अलीकडे महाराष्ट्राच्या राजकारणात हिंदी लॉबी वरचढ होऊ लागली आहे. हिंदी भाषिकांच्या बाहुल्याने महाराष्ट्र संस्कृती झपाट्याने बदलू लागली आहे.दबंगशाही वाढू लागली आहे.वाढदिवसाला तलवारीने केक कापणे. लग्नाच्या मिरवणुकीत बंदुकीचा बार उडवणे. कमरेला पिस्तुल लटकवून फिरणे. या अशा घटना महाराष्ट्रात सर्रास घडू लागल्या आहेत. अशा विकृतीचे महाराष्ट्राच्या संस्कृतीवर कलम बांधले जावू लागले आहे.शिव- फुले-शाहू-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र प्रतिगामी होवू लागला आहे.

संघ-भाजपाला दक्षिण भारताच्या राजकारणात हिंदीच्या माध्यमातून मुसंडी मारायची आहे.त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या दारावर धडका देणे सुरू केले आहे.सत्तेचा दुरुपयोग करून महाराष्ट्राला वेठीस धरल्या जात आहे. संघ-भाजपा आपल्या हिणकस राजकारणासाठी वेगवेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांचा वापर करू लागला आहे.त्यांच्यावर नवे शैक्षणिक धोरण, नवनवे निती नियम थोपवून आपला राजकीय मार्ग प्रशस्त करू लागला आहे. विद्यमान सरकारला महाराष्ट्र संस्कृतीशी,विद्यार्थ्यांच्या मानसिकतेशी, त्यांच्या हिताशी व शैक्षणिक विकासाशी काही देणे घेणे नाही. हीच बाब या हिंदी भाषा सक्ती धोरणावरून अधिक स्पष्ट झाली आहे...!

**डॉ.मनोहर नाईक,नागपूर**
९४२३६१६८२०

# पावसाची रिपरिप सुरूच



**गोंदिया:-** भारतीय हवामान विभागाने (खचऊ) जुलै महिन्यासाठी दिलासादायक अंदाज वर्तवला आहे. देशवासीयांना या महिन्यात उष्णतेपासून आराम मिळण्याची शक्यता असून, बहुतांश भागांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि सामान्यपेक्षा कमी तापमान राहण्याचा अंदाज आहे. मात्र, हा पाऊस सर्वत्र सारखा नसेल, कारण ईशान्य आणि पूर्व भारतासह काही भागांना कमी पावसावरच समाधान मानावे लागण्याची चिन्हे आहेत.

मान्सूनचे आगमन २४ मे रोजी लवकर झाले आणि ४ जूनपर्यंत तो देशाच्या निम्म्या भागात पोहोचला. मात्र, त्यानंतर दोन आठवड्यांचा खंड पडला आणि गेल्या दोन आठवड्यांत कमी दाबाच्या क्षेत्रांमुळे जोरदार पाऊस झाला. हवामान विभागाच्या अंदाजानुसार,

जून महिन्याच्या तुलनेने जुलै २०२५ मध्ये देशभरातील एकूण मासिक पर्जन्यमान दीर्घकालीन सरासरीच्या (ङझअ) १०६ टक्क्यांपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. जूनमध्ये देशात सरासरीपेक्षा ९% जास्त पावसाची नोंद झाली. मात्र देशभरात तो आसमानरित्या झालं. ज्यामुळे काही ठिकाणी कमी पाऊस तर काही ठिकाणी अतिरिक्त पावसाची नोंद झाली. पूर्व भारतात (-१६.९%) आणि दक्षिण भारतात (-२.७%) पावसाचे प्रमाण कमी होते, तर वायव्य भारतात (४२.२%) आणि मध्य भारतात (२४.८%) अतिरिक्त पावसाची नोंद झाली आहे. यामागे मान्सूनच्या वितरणातील अनियमितता कारणीभूत होती.

शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिक पावसाच्या प्रतीक्षेत होता. मृग नक्षत्र पुर्णतः कोरडा गेल्यावर २२ जूनपासून सुरू झालेल्या आद्र नक्षत्राकडून मोठया पावसाची अपेक्षा होती.मात्र आद्र लागूनही पाऊस बरसत नसल्याने आसूसलेल्या शेतकऱ्यांची धाकधूक अधिकच वाढली. पेरण्या खोळंबून होत्या, पावसासाठी देवाकडे साकळे घालण्यात आले. अखेर वरुण राजाने शेतकऱ्यांच्या हाकेला साद देत २७ जूनपासून पावसाला जिल्हयात सर्वदूर सुरवात झाली.

आज ४ दिवसीही शहरासह संपुर्ण जिल्हयात पावसाची रिपरीप सुरू असल्याने जनजीवन ठप्प झाल्याचे चित्र होते.

पावसासाठी ओळखल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्हयावर वरूण राजाने यंदा वक्रदृष्टी टाकली की काय असे चित्र निर्माण झाले होते. एप्रिल व मे मध्ये अवकाळी वादळी पावसाने जिल्हयाला धुवून काढले. उन्हाळी पीक, घरे, गोठयांचे नुकसान झाले. यात सर्वाधिक फटका उन्हाळी धानाला बसला. यंदा रोहणी व मृग नक्षत्र पुर्णतः कोरडे गेले. पावसाअभावी खरीप हंगामातील धान नर्सरीची कामे खोळंबून होती. पावसाच्या उशिरा आगमनामूळे हंगाम लांबला. जिल्हयात २६ जूनला मान्सूनचे आगमन झाले. यानंतर २७ जूनपासून सलग पाऊस बरसत आहे. आजही जिल्हयात अपेक्षेनेरुप पाऊस बरसलेला नाही. १ ते २९ जून या काळात सरासरी १८६.४ मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना केवळ ८५.३ मिमीच म्हणजेच सरासरीच्या ४५.८ टक्केच बरसला आहे. गतवर्षी याच काळात १०४ मिमी म्हणजे सरासरीच्या ५६ टक्के पाऊस झाला होता. मागील २४ तासांत जिल्हयात १७.६ मिमी पावसाची नोंद झाली. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे किमान व कमाल तापमानात घट झाली आहे. हवेत गारवा निर्माण झाल्याने गोंदियाकरांना उकाळयापासून दिलासा मिळाला आहे. आज कमाल तापमान २८.९ व किमान तापमान २१.६ अंश सेल्सिअस नोंदले गेले जे ४.४ अंशाने कमी होते.

१ ते २९ जून या कालावधीत तालुकानिहाय पावसाच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास सर्वाधिक १२१.८ मिमी पाऊस गोंदिया तालुक्यात तर सर्वात कमी पाऊस सालेकसा तालुक्यात २१.८ मिमी नोंदला गेला आहे. आमगाव १०१.३, तिरोडा ७४.९, गोरेगाव ९९.३, देवरी ५३.२, अर्जुनी मोर ८८.८, सडक अर्जुनी ७७.९ मिमी असा एकूण ८५.३ मिमी पावसाची नोंद जिल्हा प्रशासनाने केली आहे. अल्प पावसामुळे अद्यापही नदी, नाले प्रवाहीत झाले नाही. अनेक प्रकल्पांनी तळ गोठला आहे. जिल्हयाला मोठया पावसाची प्रतीक्षा आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

## आमदार विजय रहांगडाले यांच्याहस्ते चिमुकल्यांचे उत्साहात स्वागत

**तिरोडा:-** शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या अनुषंगाने तालुक्यातील गुलाबटोला येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शैक्षणिक सत्र २०२५-२६ च्या पहिल्या दिवशी एक आगळा-वेगळा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला आमदार विजयभाऊ रहांगडाले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सत्राच्या पहिल्या दिवशीच नव्या इयत्तेत दाखल झालेल्या चिमुकल्यांचे आमदारांच्या हस्ते गुलदस्ते, टोप्या, पाटी-पुस्तके व शालेय साहित्य देऊन अतिशय जिव्हाळ्याने स्वागत करण्यात आले. या विशेष क्षणाने विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह संचारला होता.

या वेळी आमदार विजय रहांगडाले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या छोट्या विद्यार्थ्यांमध्ये आपल्या समाजाचं आणि राष्ट्राचं उज्वल भविष्य दडलेलं आहे. त्यांना चांगल्या सुविधा आणि प्रेरणा देणं ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी अधिकारी स्नेहल रामटेके, प.स.सदस्य



जयप्रकाश पटले, सरपंच जुनेवार, पत्रकार रमाकांत खोब्रागडे शाळेचे मुख्याध्यापक शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड लैंगिक अत्याचार प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात येणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई:** बीड येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ङ्गएसआयटीफ्ची स्थापना करून या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्यात येईल.

तसेच दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणाऱ्या सर्वांवरही कठोर कारवाई करण्यात येईल.

# कुठे रखडला शेतकऱ्याचा विकास?



दरवर्षी पावसाळा सुरु झाला की शेतीच्या कामासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू होते. उन्हाळवाही सरताना वर्षभर शेतीसाठी लागणारे बी बियाणे, खते , लागवड, पेरणी, निंदनखुरपणी, फवारणीची किटकनाशके, आंतरमशागतीची कामे इ. खर्चाची जंत्री त्याच्या डोळ्यासमोर तरळत असते. खाजगी सावकारी, पतसंस्था नाहीतर बँकेकडून कर्ज उचलून शेतीचा खर्च भागवला जातो,अगदी ग्रामीण लोकभाषेत म्हणतात तसं 'आली घात नब घाल कावसात' म्हणजे मिळेल तिथून व्याजबट्टूयाचा फार विचार न करता कर्ज घ्यायचे आणि शेती करायची. नड असते ती. काहीही करून शेती करणे याशिवाय अन्य जगण्याचा उपायच नसतो. कर्जाचा डोंगर डोईवर आणि ऊन वारा पाऊस थंडी अंगावर झेलत घामाचे दाम मिळेल हीच अनावर आस लागलेली. मात्र शेतीतील पीकपाणी हाताशी आले की, मिळेल त्या दराने शेतमाल विकावा लागतो. धनकोची देणी चुकती करणे प्राधान्यक्रमात पहिल्या क्रमांकावर असल्याने ही अगतिकता ओढवलेली असते. आणि कर्ज बोजा चुकता करुन ठणठणपाळ झालेला भूमिपुत्र आपल्यावर कोणाचा कर्जाचा बोजा नाही म्हणून नामानिराळा झाल्यासारखा दिसत असतो, नाहीतर पीकपाणी अपेक्षेपेक्षा कमी झाले तरी निसर्गाच्या कृपेवर अथवा नशिबावर हवाला सोडून पुढच्या वर्षीची आस लावून बसतो. हे चक्र वर्षानुवर्षे चालू असते. एक पिढी जाते नव्या दमाची दुसरी तिसरी पिढी येते पण शेतकऱ्याचे दिवस काही चांगले आलेले दिसत नाही. का नाही? कुठे रखडला शेतकऱ्याचा विकास?

नेमका विकास होतो कुणाचा. जीडीपी वाढला, जीएसटी फुगला, सगळीकडे कसं चकाचक करणं सुरू आहे. डांबरी रस्ते लवकर खराब होतात म्हणून ते खरडून खरडून सिमेंटचे जाजम टाकणं सुरू आहे. रस्त्याच्या कडेला शोभिवंत गट्टू आणि विकासात भर घालणारे आलिशान टोलनाके दिमाखात मिरवत आहेत. आणि पन्नास वर्षे सिमेंट रस्ते टिकतील म्हणून शेखी मिरवणारे आणि त्या योजना अमुकाच्या सुपिक डोक्यातून आल्याची भाटगिरी करणाऱ्यांना चार सहा महिन्यांतच भेगा पडलेले काही रस्ते वाकुल्या दाखवत असतात. यासाठी निधी अपुराच पडत नाही. हा एवढा अवाढव्य खर्च. कोणाचा पैसा आहे हा? मेट्रो, मॉल, बहुमजली टोलेजंग इमारती उभ्या राहतात. नवनवे मंदिराचे बांधकाम, जुन्या मंदिरांची विकासाची कामं, काही लोकप्रतिनिधी तर त्यांच्या फंडातून धर्मस्थळांना सढळ हाताने मदत करुन राजकीय समिकरणाच संतुलन करतात.कुंभमेळ्यासाठीदेखील खास तरतूद केलेली असते.म्हणजे कसे विकासाचे मापदंड झाले आहे.अशा तथाकथित विकास योजनांसाठी तरतुदींचा भरमार , निवडणुका आल्या की जाहिराती प्रचार सभा पैशाचा जणू पूर वाहत असतो.पण वर्षभर घाम गाळून समाजाचं पोषण करणाऱ्या उत्पादक शेतकऱ्यासाठी अर्थसंकल्पात वाटा किती? तरतुदी किती?

आता शेतीचा व्यवसाय अगदीच आतबट्टयाचा झाला आहे हे वाक्य नेहमीच ऐकायला मिळते. बी बियाणे विकत घ्या.घरची जतन करून ठेवलेल्या बी बियाण्यांची कल्पना इतिहास जमा झाली. बाजारीकरण झालेल्या बियाण्यांचा वापर अपरिहार्य त्यामुळे खर्च वाढला. पाळीव प्राणी पाळणे परवडेनासे झाल्याने घरचे गोधन कमी होऊन शेणखताच्या जागी रासायनिक खतांचा वापर वाढला, खर्च वाढला. बैलांचा औतासाठी वापर, वाहतुकीसाठी बैलगाडीसाठीही जवळपास नाहीच. शेतमजूरांना शेतापर्यंत ने-आण करणे, शेती उपयोगी वस्तूंची आणि शेतीमालाची ने-आण, पेरणीपूर्व व पेरणीनंतर आणि पिक काढण्याच्या प्रक्रियेचे हरेक प्रकारे यांत्रिकीकरण झालेले आहे त्यामुळे शेतीचा लागवड खर्च बराच वाढला.

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सबसिडीवरील भांडवली धोरणाच्या वक्रदृष्टीने तर शेतकऱ्यांच्या विवंचनेत भरच टाकण्याचेच काम केले. म्हणजे बी बियाणे खते कीटकनाशके यांत्रिक मशागत मजुरी, शेतीचा लागवड खर्च महागाईने ग्रासलेला आहे.आणि वरुन शेतमालाला हमी भावाबद्दल निश्चितता काहीही नाही. दरवर्षी शेतमालाला भाववाढीची अपेक्षा असते, पण अक्षरशः शेतकऱ्याच्या तोंडाला पानं पुसली जातात. शेतकऱ्याच्या जराही हिताचा विचार न करता आयात निर्यात धोरण जाहीर करण्यात येत असतात. आणि म्हणून गेल्या बारा-पंधरा वर्षांपूर्वी जे भाव होते तेच आजही मिळतात अशी या क्षेत्रातील अभ्यासक अर्थतज्ञ कृषितज्ञ खंत व्यक्त करतात. त्यामुळे शेतकऱ्याचे शोषण अनवरत चालू असते. शोषण करण्याची आणखी कोणती शास्त्रशुद्ध पद्धत पाहीजे? तरी निगरगट्ट समाज मनाला जराही पाझर फुटू नये! म्हणजे शेतकऱ्यांचा किती अंत पहावा.

तरी शेतकरी लढत नाही असंही कुणी म्हणू शकतात. लढल्याशिवाय काही मिळू शकत नाही असेही म्हणतील. पण शेतकरी लढाई लढला. शेतकरी विरोधी तीन काळ्या कायद्यांविरोधात दिल्ली सिमेवर पोहचला. शेतकऱ्यांच्या अहिताचे कायदे आणू इच्छिणाऱ्यांचे धाबे दणाणले. ऐतिहासिक शेतकरी आंदोलनामुळे तर कायदे बदलले गेले. शरद जोशी या नेत्याच्या शेतकरी संघटनेच्या पंखाखाली एकवटला. पण शेतकरी संघटनेच्या स्वार्थी नेत्यांनी दिशाभूल केली. शेतकऱ्यांच्या जीवावर मोठे झालेले नेते शेतकरी विरोधी विचारधारेच्या राजकीय प्रवाहात सामील झालेत. नेत्यांचे उखळ पांढरे. शेतकरी भरकटला. शेतकरी लढा मागे ढकलला गेला.

हजारो वर्षे वर्णव्यवस्थेत शूद्रातिशूद्र असलेला शेतकरी ज्ञानार्जनाच्या परिघाबाहेर ठेवला गेला. वर्णधर्माचे आचरण करीत राहणे हेच पुण्याचे काम. पुरोहितशाहीने बोकाळलेल्या मतलबी धर्माच्या पाशात व्रतवैकल्ये कर्मकांडे शेतकऱ्याच्या पाचवीला पुजली गेली. अनेकदा कर्ज काढून बडेजाव करण्याची तऱ्हा त्याच्या शोषणाला पुष्टी देणारी ठरली. शेतकऱ्यांना आपल्या शोषणाची जाणीव होऊच नये. अशी व्यवस्था चोखपणे केलेली असते, शेती करणाऱ्या अगदीच जवळच्या एका नातेवाईकाकडून लग्नाची वाहवा रंजकपणे ऐकायला मिळाली.

"लेकाचं लग्न जमलं म्हणून बाप जाम खूश झाला. लग्न शाही पद्धतीनेच झालं पाहिजे या तडफफेने लग्नाची तजवीज करु लागला. काहीही खर्च येऊ दे, कर्ज होऊ दे, पण खानदानीचं नाव होईल असाच सोहळा साजरा व्हावा म्हणून, मोठ्या दिमाखात सिनेमा टी व्ही सिरियलमधल्यासारखं देखणं लग्न केलं. चार दिवस लग्नात गेले. मेहंदी, हलदी, प्रिवेडिंग, लग्न सोहळा ,वराकडील रिसेप्शन, मुलीकडली कथा आईवडिलांनी लग्नात केले नाही ते नवनवे इव्हेंट पहायला मिळतात." मस्त मजा येते. असं लांबलचक चऱ्हाट वळत असताना, मध्येच अजून पराट्या पाडायच्या हाये, ट्रॅक्टरनं नांगरणी करायची आहे. लग्नाला गेलेला गडी सांगत होता. तिकडं लग्नाचा सपाटा आणि इकडं शेतकामाचा पसारा... सारे सण समारंभ लग्न मरणंधोरणं तेरवी बारसे वाढदिवस चालूच असतात.

ऐन पीकपाणी हातात येणार अशातच कीर्तनवाले महाराज टपकले की भागवत सप्ताह नाही तर अमुक तमुक कथा आयोजन झाले की आठ-पंधरा दिवस त्यासाठी मोडलेच समजा. कर्मकांडासारखे असे चक्र चालू असते. यामध्ये त्याचे आर्थिक आणि शेतकामाचे नियोजन पुरते कोलमडून पडलेले असते. कसा उभा होईल शेतकरी? कुणा विरुद्ध उभा होईल. त्याला त्याचे शोषण करणारी व्यवस्था कळूच दिली जात नाही. महात्मा फुले दिडशे वर्षांपूर्वी शेतकऱ्याचा असूड लिहून या देशातील शोषण व्यवस्था उघडी पाडतात, तत्कालीन परिस्थितीबद्दल म्हणतात, शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोहचण्याची धर्म व राज्यसंबंधी अनेक कारणे आहेत. त्याचे विवेचन शेतकऱ्याचा असूड या ग्रंथात आले आहे. हे शेतकऱ्यांना कळू लागले तर खऱ्या अर्थाने शेतकरी ताठ मानेने उभा होईल. म्हणून त्याला मतलबी धर्माचे ठेकेदार कर्मकांडाच्या व्रतवैकल्याच्या चक्रव्यूहात जखडून ठेवतात.

धर्म धोक्यात आला म्हणून भयभीत करतात. परधर्म द्वेष पसरुन शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेस कारणीभूत स्वधर्मी आणि स्वदेशी शोषक खळांच्या दुष्टपणावर पांघरूण घालण्याची शक्कल योजत असतात. तर मायबाप सरकार त्याची आर्थिक कोंडी सोडवण्याऐवजी भांडवली व्यवस्थेस अनुकूल होऊन शेती आणि शेतकरी दोहोंनाही वाऱ्यावर सोडून शोषक आणि शासक एकदम निर्धास्त बनलेले असतात,अशी वाच्यता नेहमीच ऐकायला मिळते.

अशा दुष्टचक्रात फसलेल्या शेतकऱ्याचा विकास कुठे रखडला. हे ध्यानात येण्यासाठी सत्यशोधक चळवळीचे शेतकऱ्याच्या उत्थानासाठी योगदान, शोषक सावकारशाही पुरोहितशाहीविरुद्ध बंड,शेतकरी उठाव, देशभरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील व स्वातंत्र्यानंतरचेही शेतकऱ्याचे ऐतिहासिक लढे समजून घ्यावे लागतील.

**अनुज हुलके**

# ‘तो’ जीर्ण पूल नेमका कोणत्या विभागाचा?



**सालेकसा:-.** तेलीटोला ते बिजेपार मार्गावरील वारकरीटोलानजीक असलेल्या पुलाचा पायवा निराधार झाला आहे. त्यामुळे तो कोसळण्याची भीती आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांना माहिती विचारली असता त्यांनी आपली जबाबदारी झटकत हा मार्ग आपल्या विभागांतर्गत येत नसल्याचे सांगून हात वर केले. त्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. अशातच हा रस्ता नेमका कुणाचा आणि त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कुणाची ? असा सवाल उपस्थित होत आहे.

पावसाळा आणि रस्त्यांचा तसा छत्तीसचाच आकडा आहे. चांगल्या रस्त्यांचीही पावसाळ्याच्या दिवसांत दुरवस्था होते. त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी त्या-त्या यंत्रणांची आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असून गत ५-६ दिवसांपासून जिल्ह्यात पावसाची दमदार बॅटिंग चालू आहे. सर्वत्र पाणीच पाणी अशी स्थिती झाली आहे. जास्त पावसामुळे पेरणीची कामेदेखील खोळंबली आहेत. अशात आता रस्त्यांचेदेखील हाल झालेले बघावयास मिळत आहेत. ग्रामीण भागातील रस्ते देखभाल आणि दुरुस्तीअभावी खड्डेमय झाले आहेत. अनेक रस्त्यांवरून वाहन चालविताना खड्ड्यांत पाणी भरले असल्यामुळे ते लक्षात येत नाही. त्यामुळे

अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. सालेकसा तालुक्यातील पुजारीटोला प्रकल्पाच्या बाजूला असलेल्या तेलीटोला ते बिजेपार या रस्त्यावरील वारकरीटोलानजीक जीर्ण पूल आहे. त्या पुलाच्या भिंतींखालील पायव्याचे काँक्रिटही वाहून गेले. त्यामुळे पुलाची भिंत अधर झाली आहे. या पुलावरून जडवाहन गेल्यास कधी पूल धराशाही होईल, याची शाश्वती नाही. मात्र अद्यापही याकडे यंत्रणांचे दुर्लक्ष आहे.

उल्लेखनीय म्हणजे यासंदर्भात बांधकामाशी संबंधित असलेल्या यंत्रणांच्या अधिकाऱ्यांशी बातचित केली असता सर्वांनीच हा रस्ता आपल्या विभागाच्या अखत्यारित येत नसल्याचे सांगितले. त्यामुळे हा रस्ता नेमका कुणाचा आणि त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कुणाची? असा सवाल उपस्थित होत आहे.

### अख्खा पूलच झाला बेवारस

**तालुक्यातील तेलीटोला ते विजेपारदरम्यान असलेल्या रस्त्यावरील पूल अत्यंत जीर्ण झाला. पुलाखालील पायव्याखालील काँक्रिट गळून पडले. त्यामुळे त्या भिंती अधर झाल्या आहेत. कोणत्याही क्षणी जडवाहन गेल्यास पूल खचल्याशिवाय राहणार नाही, अशी गत आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. बांधकामाशी निगडित यंत्रणाच्या अधिकाऱ्यांना त्यासंदर्भात विचारणा केली असता सर्वांनीच तो रस्ता आपल्या अखत्यारित येत नसल्याचे सांगितल्यामुळे रस्ता आणि पूल बेवारस आहे की काय? असा समज होत आहे**

# पुनर्मूल्यांकनात वाढले ३० गुण अन तो ठरला जिल्ह्यात अव्वल

## चिन्मय वासनिकचे सुयश : कमी गुण मिळाल्याने केला होता पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज

**गोंदिया :-** इयत्ता बारावी सीबीएसई परीक्षेचा निकाल महिनाभरापूर्वी जाहीर झाला. त्यात चुलोद येथील प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी चिन्मय वासनिक याला ९२.२० टक्के गुण मिळाले होते. पण, एवढे कमी गुण मला मिळूच शकत नाही, असा विश्वास चिन्मय आणि त्याच्या पालकांना होता. त्यामुळे त्यांनी सीबीएसई बोर्डाकडे पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला. यानंतर २० जून रोजी पुनर्मूल्यांकनाचे पत्र त्याला प्राप्त झाले. त्यात त्याचे ३० गुण वाढल्याने तो जिल्ह्यात अव्वल ठरला.



चुलोद येथील प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी चिन्मय किशोर वासनिक याने सीबीएसई बोर्ड इयता बारावीची परीक्षा दिली. या परीक्षेचा निकाल गेल्या महिन्यात जाहीर झाला. यात चिन्मयला भौतिकशास्त्र १००, रसायनशास्त्र ९९, शारीरिक शिक्षण ९८, इंग्रजी ९५ आणि गणित विषयात ६९ असे एकूण ९२.२० टक्के गुण मिळाले होते. चिन्मयला मिळालेले कमी गुण पाहून त्याचे पालकसुद्धा आश्चर्यचकित झाले. तर स्वतः चिन्मयचाही यावर विश्वास बसत नव्हता.

त्यामुळे त्याने सीबीएसई बोर्डाच्या ऑनलाइन संकेतस्थळावर पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला. तसेच उत्तरपत्रिका मागविल्या. त्यात सर्व २० वस्तुनिष्ठ प्रश्न बरोबर असतानासुद्धा त्याला केवळ ८ गुण देण्यात आले होते. तर पाच-पाच गुणांचे दीर्घ प्रश्न बरोबर असताना ते चूक दिले होते. मात्र, पुनर्मूल्यांकनात चिन्मयचे चक्क ३० गुण वाढल्याने त्याची टक्केवारी ९२.२० वरून ९८.२० टक्के झाल्याने तो सीबीएसई बोर्ड बारावी परीक्षेत जिल्ह्यात अव्वल ठरला. याबद्दल चिन्मयचे वडील प्रा. डॉ. किशोर वासनिक, आई प्रा. दर्शना वासनिक व शाळेच्या शिक्षकांनी त्याचे कौतुक केले आहे.

### इयत्ता दहावीमध्येसुद्धा घडला असाच प्रकार

**चिन्मय वासनिक हा इयत्ता दहावीत असतानासुद्धा त्याला सुरुवातीला कमी गुण मिळाले होते. पण, नंतर त्याने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला असता त्यात गुण वाढले. त्यामुळे इयत्ता दहावीच्या परीक्षेतसुद्धा तो ९८.२० टक्के गुण घेऊन जिल्ह्यात अव्वल आला होता.**


**वनपरिक्षेत्र अधिकारी, नवेगांव राष्ट्रीय उद्यान यांचे कार्यालय नवेगांवबांध**

Phone No.07196-228051 E-Mail-rfopark@gmail.com

**-जाहीर निविदा सुचना-**

NNP/TN/02/2025-26

नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली अंतर्गत नवेगाव राष्ट्रीय उद्यान वनपरिक्षेत्र यांच्या वतीने खालील कामासाठी B-1 दोन लिफाफा पद्धतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून/मजुर कामगार संस्थाकडून निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ निविदा पद्धतीने बंद लिफाफ्यात सादर करावयाची आहे.

| अ.क्र. | वनपरीक्षेत्र | कामाचे गाव | कामाची रक्कम | निविदा सोबत भरावयाची इसारा रक्कम | कोऱ्या निविदा प्रपत्र किंमत | काम पूर्ण करावयाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवेगाव राष्ट्रीय उद्यान | EDC समिती मनेरो मार्फत निशानी संरक्षण कॅम्पवर कक्ष क्रमांक ७०० मध्ये बोरवेल खोदकाम करणे व सोलर पंप (सर्व साहित्यासह) लावणे. | ३२०२८१/- | ३२०३/- | ५००/- | १५ दिवस | सुशिक्षीत बेरोजगार यांचेकरिता राखीव |


**निविदा प्रसिद्धीचा तपशिल**

| | |
|---|---|
| निविदा विक्री दिनांक | दिनांक-३०/०६/२०२५ ते दिनांक ०६/०७/२०२५ ला सायं.४.०० वाजता पर्यंत (सुटटी च्या दिवशी कार्यालयीन वेळेत निविदा विक्री व स्वीकारणे चालू राहील) |
| निविदा सादर करावयाचा शेवटचा दिनांक | दिनांक-०६/०७/२०२५ सायं.४.०० वा. पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक-०७/०७/२०२५ सकाळी-११.०० वा.नंतर |

सदर कामाबाबतच्या इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध असून त्यानुसार निविदा सादर करावे. निविदा कोणत्याही कारणास्तव अस्विकृत करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाराकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**वनपरिक्षेत्र अधिकारी**
**नवेगांव राष्ट्रीय उद्यान**


# शहरातील नवीन उड्डाण पुलावर पिंपळाची झाडे



**गोंदिया :-** शहरातील वाहतूक सुलभ करण्यासाठी लाखो रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेला नवीन उड्डाण पूल सध्या दुर्लक्षित अवस्थेत दिसत आहे. पुलाच्या भिंतींमध्ये अनेक ठिकाणी पिंपळाचे झाड उगवले आहे. या झाडांची मुळे भिंतीच्या आत खोलवर जात असून, बांधकामाला धोका निर्माण होत असल्याचे जाणकार सांगत आहेत.

पुलाच्या सिमेंट काँक्रीटच्या भिंतींमध्ये भेगा पडल्या असून, त्या भेगांमध्ये पिंपळासह इतर लहान झाडेही वाढू लागली आहेत. पिंपळाचे झाड विशेषतः खोलवर मुळे पसरवणारे असल्याने यामुळे काँक्रीटची मजबुती कमी होऊन पाणी झिरपणे सुरू होते. हे पाणी लोखंडी सळ्यांपर्यंत पोहोचल्यास गंज निर्माण होऊन पुलाच्या संरचनेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनेक वेळा तक्रार केली असूनही अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही. पावसाळ्यात या झाडांची वाढ वेगाने होत असल्याने लवकरात लवकर ही वनस्पती काढून योग्य दुरुस्तीची आवश्यकता आहे. यापूर्वीदेखील शहरातील काही पुलांवर अशीच परिस्थिती उद्भवल्याने मोठ्या प्रमाणात निधी खर्च करून दुरुस्ती करावी लागली होती. त्यामुळे नवीन पुलाची लवकरात लवकर देखभाल व योग्य तपासणी करून ही वाढती झाडे त्वरित काढण्यात यावीत, अशी मागणी येथील डॉ. ऋतू जैन यांनी केली आहे

# सडक अर्जुनी तालुक्यात एक मिनिटात लावली एक हजार रोपटी

**सडक अर्जुनी :-** तालुक्यातील डव्वा येथील राष्ट्रीय पंचायतराज पुरस्कार प्राप्त ग्राम पंचायतने पर्यावरण संवर्धनासाठी सप्रेम फाऊंडेशन च्या सहकार्याने वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला. या उपक्रमातंर्गत शुक्रवारी (दि.२७) डव्वा येथे एका मिनिटात १ हजार रोपटे लावण्याचा विक्रम करण्यात आला.सरपंच योगेश्वरी चौधरी यांच्या पुढाकाराने व सप्रेम फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा उपक्रम शुक्रवारी राबविण्यात आला. यावेळी एक हजार केसर आंबा, इतर झाडांच्या रोपट्यांची लागवड करण्यात आली.

यावेळी जि.प.सदस्य भुनेश्वर पटले,पंचायत समिती सभापती चेतन वडगाये, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर वासनिक, सडक योजनेचे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन ठाकरे, गटविकास अधिकारी नरेगा डी.एस.लोहबरे, वनक्षेत्र अधिकारी उमेश गोटेफोडे, जिल्हा सहाय्य कार्यक्रम अधिकारी सुरेखा ब्राह्मणकर, तालुका सहाय्यक कार्यक्रम अधिकारी हरेश कटरे, जागेश्वर लंजे, गटशिक्षणाधिकारी चव्हाण, वनरक्षक दामिनी लांजेवार, राखी काठेवार, अक्षय नंदेश्वर, शालू मेंडे, प्रियंका नागपुरे, वनिता ब्राह्मणकर, प्रिती कोहळे, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

डव्वा ग्रामपंचायतच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी गावात विविध नाविन्यपुर्ण उपक्रम राबविले जात आहे. याच उपक्रमाचा एक भाग व गावकऱ्यांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करण्यासाठी एका मिनिटात एक हजार रोपटी लावण्याचा उपक्रम राबविण्यात आला.



### गावात प्लास्टिक बंदी

**पृथ्वीवरील वाढत्या प्रदूषणामुळे तापमाणात वाढ होत आहे.याचा परिणाम मानवी शरीर आणि वनस्पती पिकांवर होत आहे. हे थांबवायचे असेल तर आधी ग्रामपंचायतीने पुढाकार घेण्याची गरज आहे. हीच बाब लक्षात घरोघरी सौर ऊर्जेचा वापर करणे, प्लास्टिक बंदी, फटाके बंदी अश्या उपाय योजना करण्यात आल्या आहेत.**

# प्राथमिक शिक्षकांना बीएलओचे काम नको

**गोंदिया :-** प्राथमिक शिक्षकांवर बीएलओचे (बुथ लेव्हल ऑफिसर) काम देऊ नये, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. यासाठी समितीच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड यांची भेट घेऊन त्यांना मागणीचे निवेदन दिले आहे.



नवीन शैक्षणिक सत्राला सुरुवात झालेली असताना अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता जाणवत आहे. शासनाचे विविध शालेय उपक्रम, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची जबाबदारी, शालेय पोषण आहार, गाव सर्वेक्षण, रेकॉर्ड ठेवणे यांसह इतर कामांमुळे शिक्षकांवर प्रचंड ताण आहे. नवीन संचमान्यतेनुसार अनेक पदे रिक्त झाल्याने कमी शिक्षकांवर संपूर्ण शाळा चालवावी लागत आहे. त्यामुळे बीएलओचे कामही शिक्षकांकडे सवान मानव अधिकारी तथा दडास्य सायसोपविल्यामुळे गोरगरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

समितीने शासनाच्या या निर्णयाकडे संवेदनशीलतेने पाहण्याची मागणी केली आहे. यावर उपविभागीय अधिकारी गायकवाड यांनी सकारात्मक भूमिका घेत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करून लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके यांच्या नेतृत्वात निवेदन देताना तालुकाध्यक्ष गजानन पाटणकर, सरचिटणीस मिथुन चव्हाण, तेजराम नंदेश्वर, जिल्हा पदाधिकारी विनोद बहेकार, रवी जाधव, विलास लंजे, गणेश कांगणे, वैशाली शिवणकर, सरोज लिमजे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### अन्यथा बहिष्कार घालण्याचा दिला इशारा

**शिक्षकांवर मोठ्या प्रमाणात अशैक्षणिक कामे लादण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होते. अशात जर बीएलओचे काम तत्काळ काढून घेण्यात आले नाही, तर संघटनेच्या वतीने सामूहिक बहिष्कार घालण्यात येईल, असा इशाराही समितीच्या वतीने निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळाने दिला आहे.**

# लोकशाही दिन सोमवारी

**गोंदिया :-** दर महिन्याच्या पाहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. दिनांक ७ जूलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहामध्ये लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचे कडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील. जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनानिमित्त ज्या नागरिकांनी १५ दिवसापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित राहून आपल्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी सादर करावीत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी केले आहे.

# घरोघरी संविधान उद्देशिकेचे वाटप करून करणार जागर

## देवरी नगरपंचायतचा उपक्रम : संविधान निर्मितीचे अमृतमहोत्सवी वर्ष

**देवरी :-** भारतीय संविधान निर्मितीचे हे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू आहे. त्यानिमित्त हर घर संविधान उपक्रमांतर्गत शहरात घरोघरी जाऊन उद्देशिका वाटप करण्याचा उपक्रम नगरपंचायत देवरीने हाती घेतला आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येकाला भारतीय संविधानाचा अर्थ समजण्यास निश्चित मदत होणार आहे.

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय संविधानातील प्रत्येक कलम हे मानवी मूल्यांचे रक्षण करणारे आहे. मआम्ही भारताचे लोकफया भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेच्या शब्दातच देशाला एकता, अखंडता व समानतेत गुंफले आहे. प्रत्येकाला समानतेचा अधिकार दिलेला आहे. याशिवाय आपले मत व्यक्त करण्याचा, आपल्या मनाप्रमाणे नोकरी, उद्योग, व्यवसाय करण्याचा अधिकार दिलेला




देवरी नगरपंचायत येथे संविधान उद्देशपत्रिकेचे प्रकाशन करताना पदाधिकारी.

आहे. आपल्या संविधानामुळे देशात प्रत्येक जाती-धर्माचे नागरिक गुण्यागोविंदाने राहत आहेत. याच एकतेच्या जोरावर भारताने विविध क्षेत्रात प्रगती करत जागतिक स्तरावर आपल्या देशाचे स्थान उंचावले आहे, असे नगराध्यक्ष संजू उईके यांनी सांगितले. शासन परिपत्रकानुसार हर घर संविधान अभियानांतर्गत शहरातील नागरिकांच्या घरोघरी जाऊन संविधान उद्देशिका, प्रास्ताविका वाटपाचा उपक्रम देवरी नगरपंचायतचे नगराध्यक्ष संजू उईके यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेतला आहे. उद्देशिका वितरण कार्यक्रमाचे आयोजन नगरपंचायत कार्यालय येथे २५ जून रोजी करण्यात आले.

### शहरातील सर्व १७ प्रभागांत राबविण्यात जाणार उपक्रम

**यावेळी देवरी शहरातील १७प्रभागांमधील प्रत्येक घरामध्ये उद्देशिकेचे वाटप नगरसेवकामार्फत करण्यात येणार असल्याने यावेळी सर्व नगरसेवकांना उद्देशिकाचे वितरण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष संजू उईके, उपाध्यक्ष प्रज्ञा संगीडवार, नगरसेविका कौशल्या कुंभरे, पिंकी कटकवार, तनुजा भेलावे, नूतन सयाम, कमलबाई मेश्राम, रितेश अग्रवाल, पारस कटकवार, नगरपंचायतचे मुख्याधिकारी करिष्मा वैद्य व सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.**

# कागदावर गाळ काढणे सुरु; मात्र प्रत्यक्षात गौण खनिजाचे तलावातून उत्खनन?

**गोंदिय :-** राज्य शासनाची गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार हे महत्त्वाकांशी योजना सुरू आहे. त्यात तलावातील गाळ काढून तलावाचे पुनरुज्जीवन करावे असे आदेश आहे. त्याचा फायदा घेत कागदोपत्री तलावांतील गाळ काढण्याचे काम सुरू असल्याचा दावा केला जात असला तरी, प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी गाळाऐवजी सर्रास मुरूम, माती उत्खनन केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे एकीकडे जलसंधारणाच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च होत असताना, दुसरीकडे नैसर्गिक साधनसंपत्तीची मोठ्या प्रमाणावर लूट सुरू असल्याचे चित्र गोंदिया व भंडारा जिल्ह्यात आहे.

अनेक गावांमध्ये तलावातील गाळ काढण्याचे आदेश दिले आहेत. या कामांचा उद्देश तलावांची साठवण क्षमता वाढवणे आणि भूजल पातळी सुधारणे हा आहे. मात्र, या संधीचा गैरफायदा घेत काही ठेकेदार घेत असून गाळाच्या नावाखाली जेसीबी लावून तलावांच्या खोलवर भागातून मुरूम काढत आहेत. हा मुरूम नंतर शासकीय व खाजगी कामासाठी विक्री केला जात असल्याची धक्कादायक माहिती आहे. विशेषत:



या योजनाचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा हा त्यामागील मुख्य हेतू आहे. याकरिता शासकीय अनुदानही शेतर्क?यांना दिला जातो.

अडीच हेक्टर शेती असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येते. शासन त्याकरिता अनुदानही थेट शेतर्क?यांच्या खात्यात जमा करते. परंतु स्थानिक शेतकऱ्यांना याबाबत माहितीच नाही. तलावातील गाळ काढून शेतीत ती घालून शेतमालाचे उत्पादन वाढण्याकरिता ही योजना शासनाने येथे सुरू केली आहे. परंतु येथे महत्त्वकांशी शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. गाळ काढल्याने तलावांची खोली वाढून पाणी साठवण क्षमता वाढते, पण मुरूम उपसल्याने

### तलावाचे अस्तित्व धोक्यात

**गाळ काढण्याच्या नावावर तलावाला पोखरले जात असल्याने या तलावाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तलावाच्या मध्यभागातून उत्खनन न करता तलावाच्या काठावरून मुरमाचे उत्खनन केले जात असल्याने तलावाच्या काठावरच मोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे येथे अपघाताची शक्यता अधिक आहे.विशेष म्हणजे ज्या संस्थांना गाळ काढण्याचे काम दिले गेले,त्यांनी स्थाानिक ग्रामपंचायत प्रशासनाच्या मागणीकडेही दुर्लक्ष केल्याचे दिसून आले आहे. येथे गाळ काढायच्या नावाखाली दिवसाढवळ्या मुरूम काढला जात आहे. अधिकारी येथे केवळ कागदोपत्री पाहणी करतात की डोळेझाक करतात असा प्रश्न उपस्थित होत असून त्याच्या गंभीर परिणाम या परिसरातील शेतकऱ्यांना व सर्वसामान्यांना भोगावा लागणार आहे, तलाव खोदकामामुळे पाण्याची पातळी निश्चितच आणखी येथे खाली जाईल. त्याचा फटका येथे बसणार आहे. या गंभीर प्रकाराकडे जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन, प्रत्यक्षात गाळ काढला जात आहे की मुरूम, याची कठोरपणे तपासणी करण्याची गरज आहे. अन्यथा, जलसंधारणाचा हा देखावा केवळ कागदावरच राहील आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची अशीच लूट सुरू राहील अशी भीती व्यक्त केली जात आहे.**

### लघु पाटबंधारे विभागाचा तलाव

**दवडीपार,अदासी,खमारी, सिरपूरबांध शिवारातील तलाव हे विस्तीर्ण असून या तलावात मुरूम मोठ्या प्रमाणात या तलावाची मालकी व नियंत्रण लघुपाटबंधारे व पाटबंधारे विभागाकडे आहे. त्यामुळे या तलावाचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची जबाबदारी निश्चितच या विभागाची आहे. परंतु येथे मुरमाचे सर्रास उत्खनन सुरू असूनही त्याकडे मात्र अद्यापही पाटबंधारे विभागाचे लक्ष गेले नाही काय असा प्रश्न ते उपस्थित होतो. तलावातून जेसीबीने मुरुमाचे उत्खनन रात्री व दिवसाही सुरु आहे. याकडे स्थानिक महसूल प्रशासनाचेही दुर्लक्ष दिसत आहे. तलावातील मुरमाच्या वापर हा शासकीय कामावर व खाजगी कामावरही केला जात असल्याची माहिती आहे. त्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूल येथे बुडत आहे.**

तलावांची नैसर्गिक रचना बिघडते आणि पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होतो. परंतु याकडे कुणीच लक्ष द्यायला तयार नाही.

# भूसुरुंग स्फोटातील आरोपी अटक! १५ जवानांच्या हत्येत सहभागी माओवादी जाळ्यात

**गडचिरोली:-** छत्तीसगड सीमवरील कवंडे येथे घातपात घडवून आणण्याकरता रेकी करत असताना एका जहाल माओवाद्याला २७ जून रोजी पोलिसांनी जेरबंद केले.अंकल ऊर्फ मन्नू सुलगे पल्लो (२८,रा. कवंडे ता. भामरागड) असे त्याचे नाव आहे. कुरखेडा तालुक्यातील जांभूळखेडा येथे सहा वर्षांपूर्वी भूसुरुंग स्फोटात १५ जवान शहीद झाले होते. या हल्ल्यातही त्याचा सक्रिय सहभाग होता.

एकेकाळी माओवाद्यांचे आश्रयस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवंडे येथे पोलिसांनी माओवादविरोधी अभियान गतिमान केले आहे.२७ जून रोजी कवंडे जंगल परिसरामध्ये विशेष अभियान पथकाची दोन पथके, कवंडे येथील पोलिस पथक आणि राज्य राखीव दलाच्या कंपनी ३७ बटालियनचे एक पथक माओवादविरोधी अभियान राबवित होते. यावेळी त्यांना एक संशयित व्यक्ती फिरत असताना आढळून आल्याने त्याला ताब्यात घेतले होते. पोलिस मुख्यालयात आणून त्याची चौकशी केली असता तो अंकल उर्फ मन्नू सुलगे पल्लो असल्याचे निष्पन्न झाले. सध्या तो कोरची दलममध्ये उपकमांडर म्हणून कार्यरत होता.

कवंडे जंगल परिसरात घातपात करण्याकामी रेकी करण्यासाठी



### दोन मोठ्या हल्ल्यांत सहभाग

**२ मे २०२९ रोजी कुरखेडा तालुक्यातील जांभूळखेडा जंगल परिसरात झालेल्या भुसुरुंग स्फोटात १५ जवान शहीद झाले होते. या हल्ल्यामध्ये अंकल ऊर्फ मन्नू सुलगे पल्लो याचा सक्रिय सहभाग होता. यासोबतच खोब्रामेंढा जंगलात २९ मार्च २०२१ रोजी झालेल्या चकमकीतही तो सामील होता. त्याच्यावर शासनाचे सहा लाखांचे बक्षीस होते.**

### १३ व्या वर्षी नक्षल चळवळीत

**वयाच्या तेराव्या वर्षीच अंकल उर्फ मन्नू पल्लो हा नक्षल चळवळीत दाखल झाला. मूळचा कवंडेचा असलेल्या अंकल २०१२ मध्ये छत्तीसगडमधील माओवाद्यांच्या निब कंपनीतून सदस्य पदावर भरती झाला. २०२७ मध्ये तो भामरागड दलममध्ये बदली होऊन आला.२०१७ ते २०२० या दरम्यान कोरची दलममध्ये उपकमांडर म्हणून त्याने काम केले. २०२० पासून तो महाराष्ट्र -छत्तीसगड सीमेवर कवंडे जंगल परिसरात राहून माओवादी चळवळीत काम करायचा.**

आल्याची कबुली त्याने दिली. त्याच्यावर पाच गुन्हे नोंद असून तपासकामी त्यास कुरखेडा पोलिसांच्या ताब्यात दिले. २८ रोजी त्यास कुरखेडाच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

पोलिस अधीक्षक नीलोत्पल,अपर अधीक्षक एम. रमेश, श्री. सत्य साई कार्तिक, उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे व भामरागडचे उपअधीक्षक अमर मोहिते, कुरखेडाचे उपअधीक्षक रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कवंडेचे प्रभारी अधिकारी उपनिरीक्षक मंदार शिंदे, विशेष अभियान पथक तसेच सीआरपीएफ ३७ बटा. सी-कंपनीचे अधिकारी व जवान यांनी पार पाडली.

# आमगाव तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी चालाना हवी



### एमआयडीची स्थापना करण्याची मागणी

**आमगाव:-** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र सरकारचे एक विभाग आहे, जे व्यवसाय क्षेत्र सुरू करण्यासाठी आणि महाराष्ट्रातील औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी कार्यरत आहे. पण जिल्ह्याच्या आमगाव तालुक्यात रोजगाराच्या सुविधा उपलब्ध नाहीत. यामुळे रोजगारासाठी मजुरांना दुसऱ्या शहरांमध्ये पलायन करावे लागते.

आमगाव तालुका महाराष्ट्र राज्याच्या गोंदिया जिल्ह्यातील प्रमुख तालुका आहे, ज्यामध्ये आठ गाव एकत्र करून नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. हे शहर नागपूर-रायपूर रेल्वे मार्गाच्या मध्ये वसलेले आहे. बाघ नदीचे पाणी हे मुख्य स्त्रोत आहे जे छत्तीसगडहून येते. तालुक्यात मुख्यत्वे तांदूळ शेती होते आणि तेंदूपत्ता हंगामात तेंदूपत्ता संकलन करून ग्रामीणांना रोजगार मिळतो. २०११ च्या जनगणनेनुसार आमगाव तालुक्याची लोकसंख्या सुमारे १,३०,६५७ आहे, ज्यात ६५,१०२ पुरुष आणि ६५,५५५ महिला आहेत. तालुक्यात रोजगाराची मागणी जुनी आहे. तालुक्याची स्थापना झाले अनेक वर्षे उलटली तरी येथे सुमारे ५६ ग्रामपंचायती आणि अंदाजे ७५ गावांचा समावेश आहे. या सर्व गावांतील

मजूर व तरुणांना रोजगार म्हणून कोणताही कारखाना नाही किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची जमीन उपलब्ध नाही. त्यामुळे तरुणांना दुसऱ्या शहरांकडे पलायन करावे लागते. तालुक्याचे लोक मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहेत, परंतु शेतीचे काम संपल्यानंतर ते मोठ्या शहरांत किंवा इतर राज्यांत रोजगारासाठी निघतात. अनेक तरुण व मजुरांना काम न मिळाल्याने रोजगारासाठी धावपळ करावी लागते. एमआयडीसीची स्थापना करणे हा खूप जुना प्रश्न आहे, पण दर निवडणुकीपूर्वी जनप्रतिनिधी रोजगार समस्येचे निराकरण करण्याचे आश्वासन देतात; पण त्यानंतर कोणतीही प्रगती दिसत नाही, मग ते कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधी असोत. तालुक्यात औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून परतीच्या मजुरांना आणि तरुणांना येथे रोजगार मिळेल. एमआयडीसीच्या स्थापनेची मागणी दिवसेंदिवस बळावते आहे. जनप्रतिनिधींनी या विषयाकडे तातडीने लक्ष देऊन रोजगाराची समस्या सुटावी, आणि तरुणांना रोजगारासाठी पलायन करावे लागू नये, याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

# कार्यशाळेत दिली डास प्रतिबंधक उपाययोजनांची माहिती



**गोंदिया :-** जिल्हा हिवताप विभागाच्या वतीने तिरोडा तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात गुरुवारी (दि. २६) पावसाळापूर्व कीटकजन्य आजार नियंत्रण, जलजन्य आजार व उपाययोजनांसंबंधी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

आरोग्य सहायक व आरोग्यसेवक उपस्थित होते. हिवताप कार्यशाळेत हिवताप विभागाचे कीटकशास्त्रज्ञ अनिल चोरवाडे, जिल्हास्तरीय पर्यवेक्षक किशोर भालेराव, एम्बेड अशासकीय संस्थेचे जिल्हास्तरीय समन्वयक कांचन बिसेन यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत हिवताप कार्यालयातील कीटकशास्त्रज्ञ अनिल चोरवाडे यांनी डास प्रतिबंधात्मक उपाययोजनांची विस्तृत माहिती दिली. जिल्हास्तरीय पर्यवेक्षक किशोर भालेराव यांनी हिवताप प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण व तिरोडा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दर्शना नंदागवळी यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यशाळेत तिरोडा तालुक्यातील पाचही प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपजिल्हा रुग्णालयातील मार्गदर्शन केले. तर फॅमिली हेल्थ इंडिया एम्बेड प्रोजेक्ट जिल्हास्तरीय समन्वयक कांचन बिसेन यांनी जिल्ह्यात स्वयंसेवकांमार्फत होत असलेले सर्वेक्षण व जनजागृतीवर माहिती दिली. कार्यशाळेसाठी तालुका आरोग्य सहायक लीलाधर निपाणे यांनी सहकार्य केले.

## कारची झाडाला धडक ; दोघांचा जागीच मृत्यू

**देवरी:-** भरधाव कारची रस्त्याच्या कडेवरील बीजाच्या झाडाला धडक बसून झालेल्या अपघातात दोन युवकांचा जागीच मृत्यू, तर एक युवक गंभीर जखमी झाला. ही घटना आज, मंगळवार १ जुलै रोजी पहाटे सुमारास देवरी-चिचगड मार्गावर परसटोला शिवारात घडली. राजा भारती (वय ३५), सोहेल शेख (वय ३२) असे मृतांची नावे असून सलमान शेख(वय २५) असे गंभीर युवकाचे नाव आहे.देहरी येथील तीन युवक कार क्रमांक सीजी ०८ आर ६२५५ ने चिचगड वरून देवरीकडे येत होते. या अपघातात मागच्या सिटवर बसलेला सलमान शेख सिटमध्ये अडकल्याने गंभीर जखमी झाला असून त्याचे दोन्ही पाय निकामी झाल्याचे सांगण्यात येत आहे.



# सरकारी कार्यालयात बर्थडे केक कापणाऱ्याला दणका बसणार

**गोंदिया :-** शासकीय कार्यालयीन वेळ म्हणजे जनतेच्या सेवेसाठी दिलेला वेळ. मात्र, काही कार्यालयांमध्ये या वेळेत वाढदिवस साजरा करणे, केक कापणे, चहा नाष्टा आणि फोटोसेशन यांसारख्या वैयक्तिक कार्यक्रमांना प्राधान्य दिले जात असल्याचे



प्रकार वाढत आहेत. हे प्रकार आता केवळ गुपचूप मर्यादित राहत नसून खुलेपणाने आणि कार्यालयीन वेळेत साजरे केले जात असल्याने, प्रशासनाच्या नियमांनाच सुरुंग लागत आहे.

राज्य शासनाने अशा प्रकारांवर कडक भूमिका घेत ममहाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९च्या अनुषंगाने परिपत्रक जारी केले आहे. कार्यालयीन वेळेत किंवा कार्यालयीन जागेवर वैयक्तिक समारंभ घेणे, हा सरळसरळ शिस्तभंग मानला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित कर्मचाऱ्याची प्रशासकीय चौकशी होऊ शकते. त्यानंतर समज देणे, लेखी तडकाफडकी तक्रार, पदोन्नती थांबवणे, निलंबन किंवा सेवा समाप्तीसारखी शिस्तभंगाची कारवाई शक्य आहे.

### सरकारी कार्यालयांत वैयक्तिक समारंभ कशासाठी ?

**वाढदिवस ही वैयक्तिक गोष्ट आहे. प्रत्येक जण आपापल्या परीने वाढदिवस साजरा करतो. त्यासाठी कार्यालयीन वेळ आणि कार्यालयीन स्थळाचा वापर हे नागरी सेवकांच्या आचारसंहितेला आणि जनतेच्या विश्वासाला तडा देणारे ठरते.**

### केक वाटून सर्व विभागांत 'सेलिब्रेशन'

**वाढदिवसाच्या निमित्ताने एक-दोन विभाग नव्हे, तर संपूर्ण कार्यालयात केक आणि स्नॅक्स वाटले जातात. परिणामी, काही काळ कार्यालयाचे कामकाज ठप्पच होते. महिन्यात तीन, चार कर्मचाऱ्यांचा वाढदिवस असल्यास कामकाज प्रभावित होते.**

### कार्यालयीन वेळेत केक कटिंग; अल्पोपाहारावर ताव

**कामाच्या वेळेतच मोठ्या उत्साहात केक कापला जातो. नाष्ट्याचे आयोजन होते आणि कर्मचारी तासाभरासाठी काम बाजूला ठेवतात. काही ठिकाणी संगीत आणि मोबाइल व्हिडीओ शूटिंगही सुरू असते. अनेकदा अधिकारीही यामध्ये सहभागी होतात.**

### महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ काय म्हणतो?

**या नियमानुसार, कोणताही सरकारी कर्मचारी कार्यालयीन वेळ आणि ठिकाणी अशासकीय, वैयक्तिक, धार्मिक वा सामाजिक कार्यक्रम आयोजित करू शकत नाही. नियम क्रमांक ४, ५ व २२ अंतर्गत कर्मचाऱ्यांकडून शिस्तबद्ध, पारदर्शक आणि लोकाभिमुख वर्तणूक अपेक्षित आहे.**

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम नियोजित वेळेत पूर्ण करा

**गोंदिया :-** जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आरोग्य विभागाच्या व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना रविवारी (दि. २९) दिल्या.मागील आठवड्यात खासदार पटेल यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ तसेच आरोग्य विभागाचे सचिव व आयुक्त यांच्याशी इमारतीच्या प्रगतीविषयी सविस्तर चर्चा केली होती. लगतच्या ग्राम कुडवा येथे ६९० कोटी रुपयांच्या निधीतून अत्याधुनिक सुविधा असलेल्या नवीन इमारतीत ६५०



खाटांची रुग्णसेवा व १५० विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण या महाविद्यालयात मिळणार आहे. खासदार प्रफुल्ल पटेल हे परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळावा, यासाठी प्रयत्नशील असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम वेळेत व दर्जेदार बांधकाम होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला

# वैद्यकीय प्रवेशाचे गणित बदलणार

## कट ऑफ बाबत अंदाज सुरू; यंदा ६०० पार केवळ १३३२ विद्यार्थी

**गोंदिया:-** वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या राष्ट्रीय पात्रता वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा निकाल लागल्यानंतर आता प्रवेश प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अद्याप प्रवेश प्रक्रिया सुरू नसली तरी विद्यार्थी आणि पालकांमध्ये वैद्यकीय प्रवेशासाठीचा कट ऑफ किती राहील, याबाबत अंदाज बांधले जात आहेत.

**गुणनिहाय विद्यार्थी संख्या**

| गुण | विद्यार्थी |
|---|---|
| 144-200 | 303040 |
| 201-250 | 198346 |
| 251-300 | 157952 |
| 301-350 | 126935 |
| 351-400 | 105578 |
| 401-450 | 88239 |
| 451-500 | 69503 |
| 501-550 | 39521 |
| 551-600 | 10658 |
| 601-650 | 1259 |
| 651-686 | 73 |

विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. कमी गुणांमुळे आपल्याला वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळेल की नाही, याची भीती विद्यार्थी आणि पालकांना वाटत होती. मात्र, सर्वच विद्यार्थ्यांना कमी गुण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची ऑल इंडिया रँक कमी गुण असूनही चांगली आली आहे.

यंदाच्या निकालात ५०० पेक्षा अधिक गुण मिळिवणाऱ्यांची संख्या ५९,५०३ आहे. त्यामुळे वैद्यकीय प्रवेशाचे चित्र गतवर्षीपेक्षा भिन्न राहील. यंदा गत कित्येक वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक कठीण पेपर आल्यामुळे यावर्षी पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थ्यालाच ६८६ गुण मिळाले. यावर्षी ५०० हून अधिक गुण मिळिवणारे देशभरात फक्त ५९ हजार ५०३ विद्यार्थी असल्यामुळे यंदा वैद्यकीय प्रवेशाचा कट ऑफ मोठ्या प्रमाणात खाली येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# माधवझरीऐवजी नवेगावबांध जलाशयात अरण्यऋषींचे अस्थी विसर्जन

**गोंदिया :-** नवेगावबांधला ओळख मिळवून देणारे प्रसिद्ध पक्षितज्ज्ञ पद्मश्री तथा अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचे १८ जून रोजी सोलापूर येथे निधन झाले. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या अस्थी गोंदिया जिल्ह्यातील माधवझरी येथील माधवराव पाटील डोंगरवार यांच्या समाधिस्थळाच्या शेजारी विसावणार होत्या.मात्र, वनविभागाची परवानगी न मिळाल्याने शुक्रवारी (दि.२७) त्यांच्या अस्थी नवेगावबांध येथील जलाशयात विसर्जित करण्यात आल्या.तर तसेच माधवझरी येथील माधवराव पाटील डोंगरवार यांच्या समाधी शेजारी वटवृक्षाचे रोपण करण्यात आले.

पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे नवेगावबांधसोबत अनोखे नाते होते. त्यांनी वनाधिकारी म्हणून येथे जवळपास १२ वर्षे सेवा दिली. या काळात पवनीधाबे येथील त्यांचे गुरू माधवराव पाटील डोंगरवार यांच्याशी त्यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. माधवराव पाटील यांनी चितमपल्ली यांना



या जंगल परिसराची सखोल माहिती दिली. वन्यप्राण्यांना पाण्याची चणचण भासू नये यासाठी माधवझरी परिसर निर्माण केला. माधवराव पाटील यांचे निधन झाल्यानंतर याच परिसरात त्यांचा अंत्यविधी पार पडला होता. त्यामुळे मारुती चितमपल्ली यांनीसुद्धा माझ्याही अस्थी याच परिसरात पुरण्यात याव्यात, अशी इच्छा व्यक्त केली होती.

### परवानगीसाठी दोन तास प्रयत्न

कौशल मिश्रा हे शुक्रवारी दुपारी चितमपल्ली यांचा अस्थी कलश घेऊन गोंदिया जिल्ह्यातील धाबेपवनी येथे नारायण पाटील डोंगरवार यांच्या घरी पोहोचले. यानंतर अस्थी माधवझरी परिसरात पुरण्यासाठी वन व वन्यजीव विभागाची परवानगी मागितली. हा परिसर संरक्षित क्षेत्रात येत असल्याने तब्बल दोन तास प्रयत्न करूनसुद्धा परवानगी न मिळाल्याने व्यथित होऊन अखेर कौशल मिश्रा व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवेगावबांध जलाशयात अस्थी विसर्जित केल्या.

# आता गोंदिया-हैदराबाद उड्डाणसेवा आठवड्यातून तीनच दिवस

**गोंदिया:** - विमानसेवेत उदभवणाऱ्या समस्या आणि काही दिवसांपुर्वी अहमदाबाद येथे झालेल्या विमान दुर्घटनेमुळे हवाई प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विमान कंपन्याही पूर्वीपेक्षा अधिक सावध झाल्या आहेत आणि विमानांच्या देखभाल आणि तांत्रिक तपासणीसाठी खबरदारी घेतली जात आहे. याच अनुषंगाने गोंदिया जवळील बिरसी विमानतळावरून दररोज उड्डाण भरणारी गोंदिया-हैदराबाद विमानसेवा आता आठवड्यातून तीनच दिवस देण्याचा निर्णय इंडिगो विमान कंपनीने घेतला आहे.

येत्या २ जुलैपासून पुढील निर्णयापर्यंत बिरसी विमानतळावरून दररोज चालवल्या जाणाऱ्या इंडिगो विमान कंपनीचे विमान आता आठवड्यातून फक्त तीनच दिवस म्हणजे मंगळवार, गुरूवार व शनिवार या वारी हैदराबादसाठी उड्डाण भरेल. असे गोंदिया विमानतळ प्राधिकरणाने त्यांच्या ट्विटर हँडलवरून कळिवले आहे. यासंदर्भात बिरसी विमानतळ प्राधिकरणाचे संचालक गिरीशचंद वर्मा यांनी सांगीतले की हा निर्णय इंडिगोचा आहे. विमानतळ दररोज अधिक उड्डाण सेवा देण्यास सक्षम




आहे. जुलैच्या अखेरीस रात्रीची सेवा सुरू करण्याचे कामही सुरू असल्याचे त्यांनी सांगीतले. इंडिगोच्या बिरसी विमानतळाच्या व्यवस्थापक यांनी सांगीतले की, इंडिगोची हैदराबादला जाणारी दैनंदिन विमानसेवा आता २ जुलैपासून मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी सुरू राहील. विमानाच्या वेळेत कोणताही बदल केलेला नाही. कंपनी सप्टेंबरपासून नियमित विमानसेवा पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्नात असल्याचे ते म्हणाले.

# मामा तलावाचे गेट बांधकाम निकृष्ट दर्जाचे

**देवरी :-** तालुक्यातील शेडेपार येथील मामा तलाव गट क्र. २४२ अंतर्गत तलाव गेटचे बांधकाम करण्यात आले. परंतु, सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचा करण्यात आल्याने परिसरातील शेतकरी अडचणीत आले आहेत. या कामात कंत्राटदाराचा मनमर्जी उजागर झाला असून प्रशासनाने निकृष्ट बांधकामाची चौकशी करून कंत्राटदारावर कारवाई करावी, अशी मागणी शेडेपार येथील नागरिक व शेतकऱ्यांनी केली आहे.

तालुक्यातील शेडेपार येथिल मामा तलाव १७. ४२ क्षेत्रात आहे. तलावाला लागून असलेली शेती ही ओलिताखाली आहे. तसेच पाणी टंचाईवर मात करण्यास तलाव महत्वपूर्ण भुमिका बजावत असतो. तसेच तलावातील जलसाठ्यामुळे गावातील पाणी पातळी टिकून राहण्यास मदत होते. वर्षभर जनावर, वन्यजीवांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत असते. शिवाय



परिसरातील शेतीला सिंचनासाठी तलाव मोठा आधार आहे. तलावात पाण्याचा संचय दिर्घ काळ टिकून रहावा, याकरीता गेट तयार करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. यासाठी संबधित विभागाकडून कंत्राटदाराला कंत्राट दिले. ओलीत क्षेत्रानुसार तलावाच्या गेटचे बांधकाम करणे गरजेचे होते. परंतु, कंत्राटदाराने असे न करता तलावाच्या गेटचे काम पूर्णतः निकृष्ट दर्जाचे केले आहे. गेटमधून पाणी झिरपत आहे. तसेच गेटच्या दोन्ही बाजूला सिमेंट कॉँक्रीटचे बांधकाम पूर्णतः निकृष्ट करण्यात आला आहे. यामुळे तलावातील जलसाठा वाढल्यास गेट तुटून ओलिताखाली असलेली शेतीत पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे शेडेपार व बेलारगोंदी या क्षेत्रातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. त्यामुळे सदर कामांची चौकशी करून त्या कंत्राटदारावर कारवाई करावी तसेच गेटचे बांधकाम तंत्रशुध्द पध्दतीने करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.